



सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

घटस्थापना




https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -२२४ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ गुरुवार दि. ३ ऑक्टोंबर २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


## बांगलादेशमध्ये सरकारकडून दुर्गा पूजेवर बंदी, मंडळांना जिझिया कर देण्याचे आदेश, काही ठिकाणी मूर्ती तोडल्या

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३ मीरापारा**

विद्यार्थ्यांच्या तीव्र आंदोलनानंतर बांगलादेशमध्ये दोन महिन्यांपूर्वी सत्तांतर झाले होते. या सत्तांतरानंतर शेख हसिना यांच्या नेतृत्वाखालील सरकार जाऊन मोहम्मद युनूस यांच्या नेतृत्वाखालील काळजीवाहू सरकारची स्थापना बांगलादेशमध्ये झाली आहे. दरम्यान, या सत्तांतरानंतर बांगलादेशमधील परिस्थिती मोठ्या प्रमाणात बदलली असून, येथे धार्मिक अल्पसंख्याक असलेल्या हिंदूंना मोठ्या प्रमाणावर टार्गेट करण्यात येत आहे. बंगालप्रमाणेच बांगलादेशी हिंदूही नवरात्रौत्सव आणि दुर्गा मोठ्या प्रमाणात साजरा करतात. मात्र बांगलादेशात यावेळी दूर्जा पूजेवरून वाद सुरू आहे. तसेच अनेक ठिकाणी हिंदूंना दुर्गा पूजेची परवानगी नाकारण्यात आली आहे. तर काही ठिकाणी देवीच्या मूर्ती तोडण्यात आल्याचे प्रकारही घडले आहेत.



बांगलादेशमधील मोहम्मद युनूस यांच्या नेतृत्वाखालील सरकार आणि मुस्लिम संघटनांनी हिंदूंना दुर्गा पूजा करण्याची परवानगी देण्यास नकार दिला आहे. देशामध्ये सुरक्षा व्यवस्था तितकीशी चांगली नाही. तसेच हल्ला होण्याचा धोका आहे, असं कारण परवानगी नाकारताना देण्यात आलं आहे. दरम्यान, ज्या मंडलांना दुर्गापूजेची परवानगी मिळाली आहे. त्यांच्यावरही जाचक अटी लादण्यात आल्या आहेत. या मंडळांना नमाज सुरू असताना शांतता बाळण्याचे आदेश देण्यात आले आहेत. म्हणजेच नमाज पठण सुरू असताना पूजा किंवा भजन करता येणार नाही. बांगलादेशमधील अनेक भागांमधून दुर्गा मातेच्या मूर्तींची तोडफोड झाल्याच्या बातम्या येत असतानाच हे आदेश देण्यात आले आहेत. आज सकाळीच किशोरगंज येथील बत्रिश गोपिनाथ जीउर आखाडा येथे दुर्गामातेची नवी मूर्ती तोडण्यात आली. तर कोमिला जिल्ह्यामध्येही दुर्गामातेची नवी मूर्ती तोडण्यात आली. तसेच मंदिरातील फंड पेटीही चोरून नेण्यात आली.

तर नारायण जिल्ह्यातील मीरापारा येथे दोन दिवसांपूर्वी कट्टरतावाद्यांनी एका दुर्गा मंदिरावर हल्ला केल्याची घटना घडली होती. दरम्यान, सरकारी सूत्रांनी सांगितले की, ९ ऑक्टोबरपासून सुरू होणाऱ्या दुर्गापूजेपूर्वी प्रत्येक मंडळाला प्रत्येकी ५ लाख रुपये जिझिया कर म्हणून देण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्यामुळे अनेक समित्यांनी यावेळी दुर्गा पूजा आयोजित न करण्याच निर्णय घेतला आहे.

## दसरा मेळाव्याला शिवाजी पार्कात भेटणार, सर्व गोष्टींचा फडशा पाडणार; उद्धव ठाकरेंचा एल्गार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३मुंबई**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीची लगबग सुरू झाली आहे. पुढील काही दिवसांत निवडणुकीचा कार्यक्रम घोषित होण्याची शक्यता आहे. महाराष्ट्रात नवी विधानसभा २६ नोव्हेंबर २०२४ रोजी अस्तित्वात यायला हवी. तत्पूर्वी निवडणुकीसाठी मतदान होऊन निकाल लागणे गरजेचे आहे. काही दिवसांपूर्वी निवडणूक आयोगाचे पथक दोन दिवस मुंबई दौऱ्यावर आले होते. या दौऱ्यात त्यांनी राज्यातील निवडणुकीच्या तयारीचा आढावा घेतला. यातच सर्वच पक्षांच्या तयारीने वेग घेतला असून, तत्पूर्वी दसऱ्याला होणाऱ्या विविध पक्षांच्या



मेळाव्यांकडे आता राज्यातील जनतेचे लक्ष लागले आहे.

शिवसेना ठाकरे गटाने नवे गीत प्रेक्षकांच्या भेटीला आणले आहे. 'मशाल' हाती दे' असे या गाण्याचे बोल आहेत. हे ऑडिओ स्वरूपात आहे. शारदीय नवरात्र उत्सवाला सुरुवात झाली आहे. देवीला साकडे घालणाऱ्या या गीताचे अनावरण शिवसेना ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत झाले. यावेळी घेतलेल्या पत्रकार परिषदेत हे गीत लोकांपर्यंत पोहोचवण्याचे आदेश उद्धव ठाकरेंनी राज्यभरातील शिवसैनिकांना दिले. तसेच दसरा मेळाव्याबाबत माहिती दिली.

नवरात्री सुरू होत आहे. परंपरेप्रमाणे आपण दसरा मेळाव्याला शिवाजी पार्कात भेटणार आहोतच. हा जगदंबेचा उत्सव आहे. जे आसूर माजले होते, त्यांचा वध करणाऱ्या महिषासूर मर्दिनी मातेचा दिवस आहे. राज्यात अराजक माजले आहे. राज्यात तोतयेगिरी सुरू आहे. असेच अराजक छत्रपती शिवाजी महाराजांच्यावेळी राज्यावर आले होते. तेव्हा संत एकनाथांनी बये दार उघड म्हणत देवीला साकडे घातले होते. या तोतयेगिरीचा नायनाट करण्यासाठी आपण गीत तयार केले आहे. देवी आणि जनतेच्या चरणी सादर करत आहोत. दसऱ्याला सर्व गोष्टींचा फडशा पाडणार आहे. आता सणासुदीचे दिवस आहेत. कर्तव्याला कोणी विसरू नये म्हणून गीताच्या माध्यमातून प्रयत्न करत आहोत. ज्यांना जे बोलायचे ते बोलू द्या. नंतर सौ सोनार की एक लोहार की, असे होईलच, असा एल्गार उद्धव ठाकरे यांनी केला.

## जागांवरून मविआत वादाची ठिणगी? भंडारा-गोंदियातील ७ विधानसभा मतदारसंघावर काँग्रेसने ठोकला दावा, पटोलेंचा जागा सोडण्यास नकार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३भंडारा**

विधानसभा निवडणुकीचं पडघम आता वाजू लागलेलं आहे. महाविकास आघाडीच्या जागा वाटपाच्या बैठका सुरू झाल्यात. मात्र, जागांचा तिढा अद्याप सुटलेला नाही. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांचा गृह जिल्हा असलेल्या भंडारा आणि गोंदिया या दोन्ही जिल्ह्यातील सातही विधानसभा जागांवर दावा सांगून या जागा खेचून आणण्यासाठी पटोले यांनी शड्डू ठेकला आहे.



जागा वाटपाच्या पूर्वीचं नाना पटोले यांनी दावा सांगून महाविकास आघाडीतील मित्रपक्षांना कोंडीत पकडले आहे. शिवसेना उबाठाने भंडारा तर, राष्ट्रवादी काँग्रेसने तुमसर, भंडारा, अर्जुनी मोरगाव आणि तिरोडा या चार विधानसभेवर दावा केलेला आहे. नाना पटोले दोन्ही जिल्ह्यातील एकही जागा सोडायला तयार नसल्यानं महाविकास आघाडीतील शिवसेनेची मशाल आणि राष्ट्रवादीची तुतारी भंडारा-गोंदिया जिल्ह्यातील दिसणार नाही, असं चित्र सध्या तरी दिसत आहे. त्यातच आगामी काळात महाविकास आघाडीचं काम करून उमेदवारांना विजयी करण्याचा सल्ला राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनीच त्यांच्या भंडाऱ्याच्या पदाधिकाऱ्यांना दिला आहे.

**नाना पटोले मित्र पक्षांना जागा सोडायला तयार नाही**

शरद पवार यांनी खुद्द नाना पटोले हे जागा सोडायला तयार नसल्याचं वक्तव्य केले अशी माहिती शरद पवार गटाचे जिल्हाध्यक्ष किरण अतकरी यांनी दिली आहे. ते म्हणाले की, चरण वाघमारे यांचा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेशाबाबतच्या चर्चा सुरू आहेत. याबाबत पक्षाचे नेते शरद पवार, प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, सुप्रियाताई सुळे यांची त्यांनी भेट घेतली आहे. महाराष्ट्रातील अनेक लोकं आमच्या भेटीला येतात, आपलं प्रोफाईल दाखवतात, त्यांनी केलेल्या कामाचं पुस्तिका दाखवितात. भंडाऱ्यासाठी बाहेरचा कुणीही आमच्या संपर्कात नाही आणि निष्ठावंतांना डावलणार नसल्याचा शब्द शरद पवारांनी दिलाय, असे त्यांनी सांगितले.

## विधानसभेत प्रश्न विचारण्यात काँग्रेसचे आ. अमीन पटेल अव्वल, आदित्य ठाकरेंचा नंबर कितवा?

**विदर्भ प्रजसत्ताक दि.३मुंबई**

विधानसभा निवडणुकांची घोषणा कधीही होण्याची शक्यता आहे. अशा वेळी मागील म्हणजेच १४ वी विधानसभा नोव्हेंबर महिन्यात विसर्जित होणार आहे. त्यामुळे मागील पाच वर्षात कोणत्या आमदाराची कामगिरीही दमदार होती? याचा एक अहवाल संपर्क या संस्थेने तयार केला आहे. त्यात कोणत्या आमदाराने सर्वात जास्त प्रश्न सरकारला विचार? सर्वात कमी प्रश्न कोणी विचारले? कुणी काहीच प्रश्न विचारले नाहीत याचा आढावा घेतला आहे. मागील पंचवार्षिक काळात विधिमंडळाची एकूण १२ अधिवेशनं पार पडली. गेल्या विधानसभेच्या तुलनेत कोविडचा परिणाम म्हणून आरोग्यविषयक प्रश्नांत वाढ झाली आहे. यासह महिलांविषयक प्रश्नांत दुपटीने वाढ झाली. तर बालकांवरील प्रश्नांत निम्म्याहून अधिक घट झाली आहे. अल्पसंख्य समाजाविषयी मात्र केवळ नऊ प्रश्न गेल्या पाच वर्षात विचारण्यात आले आहेत. सर्वाधिक प्रश्न विचारणाऱ्यांच्या यादीत काँग्रेस आमदार अव्वल स्थानी आहे.

विधीमंडळाच्या या झालेल्या अधिवेशनामध्ये राज्यातील आमदारांनी ५,९२१ इतके प्रश्न सभागृहात मांडले. यात मुंबादेवीचे



काँग्रेस आमदार अमीन पटेल यांनी सर्वाधिक ६५६ प्रश्न मांडले. प्रश्न विचारणाऱ्या आमदारांत त्यांनी अव्वल स्थान पटकावले आहे. तर महिला आमदारांमध्ये सर्वाधिक प्रश्न हे भाजप आमदार मनिषा चौधरी यांनी विचारले आहेत. त्यांनी ४५९ प्रश्न विचारले. या विधानसभेत जवळपास ९२ जण हे पहिल्यांदा आमदार झाले होते. त्यांच्यात काँग्रेसच्या वरोऱ्याच्या आमदार प्रतिभा धानोरकर यांनी सर्वाधिक ३१६ प्रश्न विचारले आहेत. भाजपचे आशिष शेलार, काँग्रेसचे अस्लम शेख, कुणाल पाटील आणि कम्युनिस्ट पक्षाचे विनोद नोकोले हे प्रश्न विचारणाऱ्या पहिल्या पाच आमदारांत आहेत.

दरम्यान यात शिवसेनेचे युवा नेते आणि वरळी मतदारसंघाचे आमदार आदित्य ठाकरे यांनी मंत्रीपद सोडल्यानंतरच्या अडीच वर्षांमध्ये किती प्रश्न विचारले याचाही आढावा या अहवालात घेण्यात आला आहे. संपर्कच्या अहवालानुसार आदित्य ठाकरे यांनी विरोधी पक्षात असताना केवळ एक प्रश्न विचारला असल्याचे म्हटले आहे. तर सांगलीचे आमदार सुधीर गाडगे यांनी तर एकही प्रश्न विचारलेला नाही.शिरोळचे अपक्ष आमदार राजेंद्र पाटील यांनीही एकही प्रश्न विचारलेला नाही.नंदुरबार जिल्ह्यातल्या अक्कलकुवा मतदारसंघाचे प्रतिनिधी आमदार के. सी. पाडवी यांनी एकही प्रश्न विचारलेला नाही. वाशिमचे भाजपचे आमदार लखन मलिक यांनी एकही प्रश्न विचारलेला नाही. शिवाय बाळापूरचे शिवसेनेच्या आमदाराने एक प्रश्न विचारला आहे. मिरजचे आमदार सुरेश खाडे आणि बार्शीचे आमदार राजेंद्र राऊत यांनीही एकच प्रश्न विचारला आहे. दरम्यान अहवालातल्या आकडेवारीची सत्यता जाणून घेताना संपर्कच्या अधिकारी जोग यांनी ही आकडेवारी विधीमंडळाच्या संकतस्थळावरून घेतले असल्याचे स्पष्ट केले.

## हायवेवर जेवढे खांब, तेवढेच ढाबे; 'अन्न व औषधी'चे परवाने कोणाकडे?

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३अमरावती**

२१ व्या शतकात हॉटेलमध्ये जाऊन जेवण करण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. त्यामुळे वाटेल तिथे हॉटेल व ढाबे सुरू झाले असल्याचे दिसून येत आहे; परंतु या हॉटेल व ढाबेवाल्यांनी अन्न, औषध विभागाकडून परवाने घेतले आहेत का, याबाबतच प्रश्न उपस्थित होत आहे. सर्वसामान्यांचा जीवनमानात आमूलाग्र बदल झाले आहेत. संपूर्ण जीवनशैलीच बदलली आहे. विकेंडच्या नावाखाली हॉटेलमध्ये किंवा ढाब्यामध्ये जाऊन जेवण



करण्याकडे अनेकांचा कल दिसून येत आहे. त्यामुळे अनेकजण मुख्य मार्गावर हॉटेल तसेच ढाबे टाकत आहेत. अमरावती जिल्ह्यातील प्रत्येक रोड वर ज्याप्रमाणे विजेचे खांब दिसून येतात. त्याच प्रमाणातहॉटेल व ढाबे दिसून येत आहेत.बहुतांश ढाबे संचालक तसेच हॉटेल व्यावसायिकांनी अन्न व औषध विभागाकडून परवानेसुद्धा घेतलेनाहीत हे विशेष याकडे लक्ष देणे गरजेचे आहे.तर रात्रीच्या वेळेस या ठिकाणी ग्राहकाला दारू सुद्धा उपलब्ध करून देण्यात येते. आम्ही केलेल्या पडताळणीत असे आढळून आले की अनेक हॉटेल चालकांकडे कोणत्याही प्रकारचा परवाना नाही मात्र ढाबा किंवा हॉटेल दणक्यात सुरू आहे.

**बाहेरून ढाबा, आतून मात्र देशी-विदेशीचा बार!**

'बाहेरून कीर्तन, आतून तमाशा' या धर्तीवर एका ढाब्याच्या आत सुरू असलेल्या ओपन देशी-विदेशी बारवर राजापेठ पोलिसांनी धाड टाकली. तेथून देशी-विदेशी दारूसह मोबाइल व रोकड जप्त करण्यात आली. २ ऑक्टोबर रोजी राजापेठचे नवनियुक्त ठाणेदार पुनित कुलट यांच्या नेतृत्वातील डीबी स्कॉडने ही कारवाई केली.याप्रकरणी, ढाबाचालक मोहन रामशंकर चौबे (६२, रा. पवननगर नंबर १, गोपालनगर) याला अटक करण्यात आली. मोहन चौबे याच्या पवननगरस्थित मालकीच्या करण ढाब्यावर ही कारवाई करण्यात आली. डीबी स्कॉडप्रमुख पोलिस उपनिरीक्षक मिलिंद हिवरे हे पथकासह पेट्रोलिंग करत असताना करण ढाब्यावर देशी-विदेशी दारू विक्री केली जात असल्याची माहिती पथकाला मिळाली. त्याआधारे तेथे धाड टाकण्यात आली.

## ऑक्टोबर हीटचा तडाखा वाढला; अंगावर वाहताहेत घामाच्या धारा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३अमरावती**

पावसाळा संपला असून, मागील काही दिवसांपासून पावसाने हजेरीही लावलेली नाही. यामुळे पुन्हा एकदा उन्ह तापू लागले आहे. ऑक्टोबर हीटचा तडाखा वाढता राहणार असे महिन्याच्या पहिल्याच दिवशी जाणवले. मध्यंतरी २८ अंशांवर गेलेले तापमान मंगळवारी (दि.२) थेट ३१ अंशांवर पोहोचले. यामुळे मात्र नागरिकांचा जीव कासाविस झाला असून, अंगावर घामाच्या धारा वाहताना दिसत आहे.

यंदा वरुणराजा जिल्ह्यावर चांगलेच मेहरबान दिसून आले व यामुळेच जिल्ह्यात तब्बल समाधानकारक पावसाची नोंद घेण्यात आली आहे. जून महिन्यात डोळे



दाखविल्यानंतर जुलै महिन्यापासून पावसाने चांगलीच साथ दिली. त्यानंतर सप्टेंबर महिन्यात ९ व १० तारखेलाही पावसाने जिल्ह्यात चांगलीच हजेरी लावली. दुसऱ्यांचा पूरस्थिती निर्माण केली होती. पावसाच्या हजेरीमुळे नदी-नाले व तलाव तुडुंब झाले असून, पाण्याची वर्षभराची चिंता मिटली आहे.

असे असताना हवामानातील उकाडा काही केल्या कमी झालेला नाही. पाऊस बरसत होता तोपर्यंत हवामानात गारवा निर्माण होऊन दिलासा मिळत होता. मात्र, पाऊस थांबताच उकाडा वाढून अंगाची लाहीलाही होऊ लागली होती. एवढा पाऊस बरसल्यानंतरही हवामानात गारवा निर्माण होत नसल्याने निसर्गाचे चक्र समजण्यापलीकडे झाले आहे. ३० सप्टेंबर रोजी पावसाळा संपला असून, मागील काही दिवसांपासून पावसानेही हजेरी लावलेली नाही. मंगळवारी (दि.१) जिल्ह्याचे तापमान ३४.५ अंशांवर पोहोचले होते. यामुळे पुन्हा एकदा उकाडा वाढला असून, अंगाची लाहीलाही होत आहे.

## भाजपाला धक्का, हर्षवर्धन पाटलांचा मुहूर्त ठरला ! तुतारी हाती घेणार

**विदर्भ प्रजसत्ताक दि.३इंदापूर**

पितृपक्ष संपताच राजकीय घडामोभाजपाला धक्का, हर्षवर्धन पाटलांचा मुहूर्त ठरला ! तुतारी हाती डींना वेग आला आहे. सर्वच राजकीय पक्षांच्या नेत्यांनी विधानसभा निवडणुकीत उमेदवारी मिळवण्याबाबत वेगानं हालचाली करण्यास सुरुवात केली आहे. माजी मंत्री आणि पुणे जिल्ह्यातील भाजपा नेते हर्षवर्धन पाटील राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश करणार अशी गेल्या काही





दिवसांपासून चर्चा सुरु होती. आता त्याबाबतचा मुहूर्त ठरला आहे.

हर्षवर्धन पाटील यांनी गुरुवारी (३ ऑक्टेर) शरद पवार यांची भेट घेतली. शरद पवारांचं मुंबईतील निवासस्थान असलेल्या सिल्व्हर ओक या निवासस्थानी दोन्ही नेत्यांची भेट झाली. हर्षवर्धन पाटील उद्या शुक्रवार ४ ऑक्टोबर) रोजी इंदापूरमध्ये पत्रकार परिषद घेणार आहेत. या पत्रकार परिषदेमध्ये ते त्यांच्या पक्षांतराबाबतची भूमिकी जाहीर करण्याची शक्यता आहे.

हर्षवर्धन पाटील यांच्या कन्या अंकिता पाटील तसंच मुलगा राजवर्धन पाटील यांनी त्यांच्या स्टेट्सवर तुतारी वाजवणाऱ्या व्यक्तीचा फोटो ठेवत या पत्रकार परिषदेत काय होणार याचे स्पष्ट संकेत दिले आहेत.महायुतीमध्ये इंदापूर विधानसभेची जागा सध्या वादाचा विषय ठरली आहे.या जागेवर भाजपच्या हर्षवर्धन पाटील आणि राष्ट्रवादी अजित पवार गटाने दावा केला आहे.

संपादकीय ......

# शारदीय नवरात्रौत्सव आदिशक्तीचा!

आश्विन महिन्यामध्ये येणारे शारदीय नवरात्र देशभरात मोठ्या प्रमाणात साजरे केले जाते. नवरात्रात आदिशक्तीची पूजा केली जाते. धार्मिकदृष्ट्या या काळात देवीचे राक्षसांबरोबर युद्ध सुरू असते. पौराणिक कथांच्या आधारे विचार करायचा झाल्यास, मानव जातीला किंवा निसर्गाला त्रास देणाऱ्या प्रवृत्तींचा नायनाट करून ही सृष्टी सुजलाम् सुफलाम् व्हावी यासाठी या राक्षसांशी देवी युद्ध करत असते. नवरात्रामध्ये मातृशक्तीचे, नारीशक्तीचे पूजन केले जाते. स्त्री शक्तीला धर्मशास्त्राने फार मोठा मान दिलेला आहे. नवरात्रात तो अधोरेखित होतो.

बहुतेक जणांना वाटते की, आश्विन महिन्यात येते तेच एक नवरात्र आहे; पण वास्तवात तसे नाही. ऋतूमानामध्ये जेव्हा जेव्हा बदल होतो तेव्हा तेव्हा साधारणपणे नवरात्र येत असते. त्यापैकी आश्विन महिन्यातील नवरात्र सर्वांना अधिक माहिती आहे. त्याला 'शारदीय नवरात्र' म्हणतात. मराठी वर्षाची सुरुवात चैत्रातील गुढीपाडव्यापासून होते, तिथेही नवरात्रारंभ असतो. त्याला वासंतिक नवरात्र असे म्हणतात. म्हणजे वसंत ऋतूतील नवरात्र आणि शरद ऋतूतील नवरात्रे ही दोन प्रमुख नवरात्र आहेत; पण या दोन्हींच्या मध्येही शाकंभरी नवरात्र येते, राम नवरात्र येते, दत्त नवरात्र अशी निरनिराळी नवरात्रे येत असतात. लोकांचा असा समज आहे की, नवरात्र म्हटले म्हणजे नऊ रात्री त्यामध्ये आल्या पाहिजेत; पण शास्त्रकारांनी तसे काही सांगितलेले नाही. शास्त्रकार सांगतात की, प्रतिपदेपासून नवमीपर्यंत हा जो कालखंड आहे, त्याला नवरात्र म्हणायचे. काही वेळेला त्यामध्ये आठ दिवस येतात, तर काही वेळेला दहा दिवस येतात. एखाद्या तिथीचा क्षय झालेला असतो तेव्हा एक दिवस कमी झालेला असतो. एखाद्या तिथीची वृद्धी झाली तर एक दिवस वाढतो देखील.

प्रत्येक नवरात्रींचे महत्त्व वेगळे असते, तसे शारदीय नवरात्रींचेही आहे. एखाद्याला दीर्घायुष्याचा आशीर्वाद देताना 'जीवेत शरदः शतम्' असे म्हणतो. याचा विचार करायचा झाल्यास नवरात्र वसंतातही येते, मग जीवेत वसंतः शतम् असे का म्हणत नाहीत? वेदांमधली हा आशीर्वाद असून, त्यात त्याचा अर्थ असा होतो की, तुम्ही शंभर वर्षे जगा आणि शंभर वर्षे शरद ऋतू बघा. यामागची कारणमीमांसा करताना स्पष्ट होते की, ऋतू जेव्हा बदलतात तेव्हा वातावरण बदलते. शरद ऋतूमध्ये अनारोग्य वाढण्याची किंवा मृत्यूचे प्रमाण वाढण्याची शक्यता अधिक असते, त्यामुळे अनारोग्यावर अथवा मृत्यूवर विजय मिळवण्यासाठी नऊ दिवस व्रतस्थ राहण्यास सांगितले आहे. शारदीय नवरात्रात काही लोक नऊ दिवस उपवास करतात. काही जण एकच पदार्थ खातात. प्रत्येकाची परंपरा वेगळी असू शकते किंवा मतभेदही असू शकतात; मात्र या सर्व गोष्टींचा आपल्या आरोग्याशी फार जवळचा संबंध आहे. नवरात्रात आदिशक्तीची पूजा केली जाते. यामागचा धार्मिकदृष्ट्या विचार केला, तर राक्षसांबरोबर या काळात देवीचे युद्ध सुरू असते. हा एक योगमार्गातील तत्त्वज्ञानाच्या दृष्टिकोनातील भाग आहे. पौराणिक कथांच्या आधारे विचार करायचा झाल्यास, देवी सतत आपल्यावर प्रहार करणाऱ्या, मानव जातीला किंवा निसर्गाला त्रास देणाऱ्या ज्या प्रवृत्ती आहेत, त्या प्रत्येक प्रवृत्तींचा नायनाट करून ही सृष्टी सुजलाम् सुफलाम् व्हावी, सज्जन लोकांना सहकार्य व्हावे यासाठी राक्षसांशी युद्ध करत असते. ते युद्ध करत असताना मी देवीला काहीतरी साहाय्य केले पाहिजे, या हेतूने देवीची उपासना, सेवा करण्याची प्रथा यामुळे सुरुवात झाली.

देवीच्या उपासनेत 'दुर्गासप्तशती' हा प्रमुख ग्रंथ आहे. अनेक ठिकाणी या दिवसात 'दुर्गासप्तशती'चे पाठ वाचले जातात. कोणाकडे या नऊ दिवसांत नऊ पाठ वाचतात, कुणाकडे चौदा पाठ वाचतात, तर कुणाकडे नऊ दिवसांत एकच पाठ वाचला जातो. ही सेवा केल्यामुळे देवीला बळ मिळते आणि राक्षसांचा नाश लवकर केला जाऊन तिचा शीण याद्वारे थोडा कमी केला जातो, अशी धारणा आहे. नवरात्रींच्या या नऊ दिवसांत घराघरांत घट बसवण्याचीही परंपरा पाहायला मिळते. ही परंपरा फार जुनी आहे. यामध्ये जमिनीवर मातीचा एक चौथरा तयार केला जातो. त्यावर एक कलश ठेवला जातो. त्यामध्ये निरनिराळ्या ठिकाणचे पाणी घातले जाते. सप्तनद्यांचे पाणी घालणे शक्य नसल्यास, इतर नद्यांचा नामोच्चार करूनसुद्धा मंत्राने निरनिराळ्या नद्यांच्या पाण्याची निर्मिती करता येते. जसे एखाद्या धार्मिक कार्याच्या पूर्वी आचमनाच्या वेळेला तांब्याची पूजा करतो; त्या वेळी 'गंगेच यमुनेच सरस्वती...' हा जो मंत्र म्हणतो, त्यातून आपण त्या तांब्यातील पाणी त्या-त्या नद्यांचे आहे, असे गृहीत धरून त्या पाण्याने पुढील संपूर्ण पूजा करतो. त्या पद्धतीने नवरात्राच्या कलशातील पाणी मंत्र आणि नामोच्चाराद्वारे अभिमंत्रीत करून, त्यावर एक ताम्हण ठेवून त्या ताम्हणात देवीची स्थापना केली जाते. हे करत असताना खालील मातीवर सप्तधान्य पेरले जाते. हा कलश मातीचा असावा, अशी पूर्वपरंपरा आहे कारण या कलशातून आतील पाणी झिरपत मातीपर्यंत पोहोचते आणि नऊ-दहा दिवसांत पेरलेल्या सप्तधान्यांतील कोंब फुटून बाहेर येतात. म्हणजे ही नवनिर्मितीची एक प्रक्रिया आहे. 'बी' टाकल्यानंतर त्याची नवनिर्मिती झालेली आपण आठव्या-नवव्या दिवशी आपल्या डोळ्यांनी पाहतो. नवरात्राच्या नऊ दिवसांत पहिल्या दिवसापासून वेगवेगळ्या नऊ देवी सांगितलेल्या आहेत. त्यामध्ये प्रथमम् शैलपुत्रीच, द्वितीयम् ब-ह्मचारिणी, तृतीयम् चंद्रघंटेची, कुष्मांडा ती चतुर्थकम्... अशा प्रकारे नऊ देवींची वर्णने केलेली आहेत. काही ठिकाणी प्रत्येक दिवशी असणाऱ्या देवीची स्थापना करून त्या-त्या देवीची पूजा करण्याचीही प्रथा आहे.

# चिखलदऱ्यात घेतले जाते इंग्रजकालीन कॉफीचे उत्पादन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३चिखलदरा** – विदर्भाचे नंदनवन असलेल्या चिखलदरा पर्यटन स्थळावर इंग्रजकालीन कॉफीचे मळे मोठ्या प्रमाणात आढळतात. आदिवासींसह स्थानिकांना मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध होण्याच्या दृष्टीने पावले उचलण्याची गरज आहे.

अनेकदा यावर घोषणा आणि चर्चा झाल्या; परंतु त्यापलीकडे कॉफीच्या मळ्यांची लागवड झालीच नाही आणि अनेक हातांना मिळणारा रोजगार तेथेच थांबला. आज 'कॉफी डे' च्या निमित्ताने येथील कॉफीच्या मळ्यांच्या विकासाची गरज आहे. येथील चहाचे मळे संपुष्टात आले आहेत हीच स्थिती कॉफीच्या मळ्याबद्दल आता होऊ लागली आहे. इंग्रज कॉफी उत्पादित करणारे चिखलदरा हे राज्यातील एकमेव हिल स्टेशन आहे. इंग्रजांनी चिखलदरा येथे चहाचे मळे विकसित करून चहाचे उत्पादन घेतले.

इंग्रज अधिकारी ए. ई. नेल्सन व बॅचलर अर्नेस्ट यांच्या नोंदीनुसार चिखलदऱ्यात त्याकाळी चहा आणि कॉफीचे मोठ्या प्रमाणात खासगी मळे होते. चहा व कॉफीच्या लागवडीकरिता असलेला वाव बघून युरोपियन बागायतदारांना चिखलदऱ्याकडे आकर्षित झाले.

त्या बागायतदारांनी चहा व कॉफीचे मळे या ठिकाणी फुलविले. कालांतराने हे चहाचे मळे संपुष्टात आले. मात्र, रोमन कॅथोलिक मिशनरीकडील जमिनीवर कॉफीचे खासगी मळे टिकून आहेत.

**शंभर एकरात कॉफी लागवड**

मरियमपूर परिसरात जवळपास १०० एकरांत कॉफी लागवड केली गेली. इंग्रजांच्या नोंदीनुसार, चिखलदरा येथे ९७.२०० हेक्टर म्हणजेच २४० एकरांत कॉफीची लागवड होती. आज मात्र केवळ १७ हेक्टर क्षेत्रावरच कॉफी लागवड आहे.


चिखलदऱ्यात कॉफीचे उत्पादन

चिखलदरा गार्डन, वन विभागाचे बंगले आणि विश्रामगृह परिसरासह मरियमपूर भागात कॉफी वृक्ष बघायला मिळतात. अप्पर प्लॅटोवर १०० हेक्टर क्षेत्र आरक्षित समुद्रसपाटीपासून ३६६४ फूट उंचीवर असलेले चिखलदरा हे अप्पर प्लॅटो आणि लोअर प्लॅटो अशा दोन भागांत विभागले आहे.

या दोन प्लॅटोमधील उंचीतील अंतर ८० फूट आहे. चिखलदरा येथील कॉफीचे वृक्ष अप्पर प्लॅटोवर बघायला मिळतात. कॉफीकरिता अप्पर प्लॅटोवरचे नैसर्गिक वातावरण पोषक ठरले आहे. या ठिकाणी प्रदीप टोपो हे संपूर्ण कॉफीची शेती बघतात.

**केरळमधून आणले कॉफीचे रोप**

इंग्रज अधिकारी जेम्स मुल्हेरन याने चिखलदऱ्यात सर्वप्रथम कॉफी रोपांची लागवड केली. केरळमधून आणलेल्या कॉफी रोपांची त्याने चिखलदरा येथील आपल्या मुल्हेरन कॉटेज नामक बंगल्याच्या आवारात सन १८६० ते १८६१ दरम्यान लागवड केली तेव्हापासून कॉफी रुजली, १८९७-९८ दरम्यान रोमन कॅथोलिक मिशनची सुरुवात करणाऱ्या फादर थेवनेट यांनी रोजगार साधन म्हणून कॉफीचा विचार केला. १९१० पर्यंत येथे कॉफीचे मळे विकसित केले.




## आव्हान महिलांमधील आजारांचे

**विदर्भ प्रजासत्ताक**



भारतातच नव्हे, तर जगभरातील बहुतांश देशांमध्ये स्त्रियांच्या आरोग्याची स्थिती पुरुषांपेक्षा बिकट असल्याचे दिसते. कुटुंबातील इतर सदस्यांच्या आरोग्याची खूप काळजी करणारी स्त्री स्वतःच्या आरोग्याची काळजी घेत नाही; पण याचे गंभीर परिणाम मात्र भोगावे लागू शकतात.

स्त्रियांमध्ये आढळणाऱ्या समस्यांमध्ये ॲनिमिया, स्तनाचा कर्करोग, गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोग, योनिमार्गाचा दाह आणि लठ्ठपणा यांचा समावेश होतो. ॲनिमिया : शरीरात रक्ताची कमतरता आणि रक्त कमी होणे याला आपण ॲनिमिया म्हणतो. हिमोग्लोबिन किंवा लोहाच्या कमतरतेमुळे निर्माण होणाऱ्या या व्याधीमुळे आज जगातील दोन तृतीयांश महिला त्रस्त आहेत. लोह हे एक आवश्यक खनिज आहे, जे शरीरात लाल रक्तपेशी बनवते; पण जेव्हा शरीराला पुरेसे लोह मिळत नाही, तेव्हा शरीरात लाल रक्तपेशींची कमतरता निर्माण होते आणि व्यक्ती ॲनिमियाची शिकार बनते. अशक्तपणा, थकवा किंवा निद्रानाश यांसारखी लक्षणे जाणवल्यास आहाराची काळजी घेऊन आणि डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार लोह, फॉलिक ॲसिड, व्हिटॅमिन बी-१२ सप्लिमेंट्स् घेऊन या समस्येवर उपचार केले जाऊ शकतात.

स्तनाचा कर्करोग : जागतिक आरोग्य संघटनेनुसार, २०२० मध्ये २० लाखांहून अधिक महिलांना स्तनाचा कर्करोग झाल्याचे निदान झाले आणि त्यापैकी ६,७५,००० महिलांचा मृत्यू झाला. एकीकडे जगातील बहुतांश देशांमध्ये अनेक आजारांवर नियंत्रण मिळवले जात असताना, स्तनाच्या कर्करोगाची समस्या गेल्या तीन दशकांत कमी झालेली दिसत नाही. भारतातही १९६५ ते १९८५ दरम्यान कर्करोगाच्या रुग्णांमध्ये ५० टक्क्यांनी वाढ झाली आहे. २०२० च्या ग्लोबोकन डेटानुसार, देशातील सर्व प्रकारच्या कर्करोगांपैकी, केवळ स्तनाच्या कर्करोगाचे १३.५ टक्के प्रकरणे आहेत आणि कर्करोगाने मरण पावणाऱ्या एकूण रुग्णांपैकी १०.६ टक्के मृत्यू हे स्तनाच्या कर्करोगामुळे होते. महिलांना स्तनाच्या कर्करोगाचा सर्वाधिक फटका बसतो कारण त्यांना अनेक प्रकारच्या शारीरिक अनियमिततेने वेढलेले असते आणि त्या निष्काळजीही असतात. स्तनाचा कर्करोग रोखण्याचा सर्वात प्रभावी मार्ग म्हणजे नियमित आरोग्य तपासणी करून घेणे आणि थोडासा संशय आल्यास उपचार सुरू करणे.

**गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोग** : स्तनाच्या कर्करोगानंतर हा दुसरा सर्वात धोकादायक कर्करोग असून, बहुतांश स्त्रियादेखील याला जास्त बळी पडतात. एका अहवालानुसार, दरवर्षी जगभरात १,३०,००० पेक्षा जास्त महिलांचा गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाने मृत्यू होतो. भारतीय महिलांमध्ये हे प्रमाण सर्वाधिक आहे. २०२० मध्ये गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाने ७४००० महिलांचा मृत्यू झाला. तथापि, हा एकमेव कर्करोग आहे, जो सर्वात कमी वेगाने पसरतो. गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोग पसरण्यास १५ ते २० वर्षे लागतात. बहुतेकदा स्त्रिया त्याच्या लक्षणांकडे लक्ष देत नाहीत. शरीरसंबंधांदरम्यान वेदना होणे, त्यानंतर रक्तस्राव होणे, मासिक पाळीनंतर वारंवार रक्तस्राव होणे, रजोनिवृत्तीनंतरही रक्तस्राव होणे ही त्याची मुख्य लक्षणे आहेत.

**लठ्ठपणा** : पुरुषांपेक्षा महिलांना लठ्ठपणाचा त्रास जास्त होतो. महिलांना लठ्ठपणाचा त्रास होण्याचे सर्वात मोठे कारण म्हणजे त्या नियमितपणे व्यायाम करत नाहीत. शिवाय त्यांची जीवनशैलीही खूप अनियमित असते. अनेक महिलांना थायरॉईडचा त्रास होतो आणि आज ही एक मोठी समस्या बनली आहे. या दोन्ही समस्या एकत्रितपणे लठ्ठपणाला कारणीभूत ठरतात. लठ्ठपणा धोकादायक आहे

# सेंद्रिय कर्ब वाढविण्यासाठी हिरवळीच्या खतातील ह्या दोन पिकांची करा लागवड

**विदर्भ प्रजासत्ताक**

जमिनीचा पोत चांगला ठेवायचा असेल आणि जमिनीचे आरोग्य चांगले ठेवून आपल्याला पुढच्या पिढीला आपली जमीन द्यायची असेल तर आपण जमिनीमध्ये सेंद्रिय पद्धतीने शेती करणे आवश्यक आहे.

सेंद्रिय पद्धतीने शेती करत असताना आपण सेंद्रिय पद्धतीच्या खतांचा वापर करणे गरजेचे आहे. सेंद्रिय पद्धतीच्या खतांचा वापर करत असताना आपण आपल्या शेतामध्ये हिरवळीचे खत वापरणे गरजेचे आहे.

सेंद्रिय कर्ब हा जमिनीचा महत्वाचा गुणधर्म आहे. महाराष्ट्रातील जमिनीमध्ये १ टक्केपेक्षा सेंद्रिय कर्बाची पातळी राखणे आवश्यक आहे. परंतु हे प्रमाण हळूहळू कमी होत आहे.सेंद्रिय खते पिकांना जास्त प्रमाणात लागतात. परंतु आपण त्याप्रमाणात देवू शकत नाही. कारण या खतांचा तुटवडा जाणवत आहे. अशा परिस्थितीत जमिनीचा पोत, कस, सुपिकता टिकविण्यासाठी हिरवळीच्या खतांचा वापर करणे काळाची गरज आहे.

हिरवळीचे खत हे इतर शेणखत व कंपोस्टखत यांना पर्याय ठरु शकत नाही. आजच्या काळामध्ये सेंद्रिय खतांच्या किंमती व रासायनिक खतांच्या किंमती वाढलेल्या आहेत. खतावरील खर्च कमी करण्यासाठी हिरवळीच्या खतांची मदत होते.

हिरवळीचे खत जमिनीमध्ये

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष



वनस्पतींची हिरवी पाने किंवा जमिनीमध्ये हिरवी पिके वाढवून पीक फुलोऱ्यात असतांना त्याच जमिनीमध्ये नांगरणीच्या सहाय्याने गाडतात. या पध्दतीस हिरवळीचे खत असे म्हणतात.

**हिरवळीचे खते देणारी पिके १) ताग**

- ताग हे हिरवळिचे उत्तम खत आहे. ज्या विभागात पुरेसा पाऊस अथवा सिंचनाच्या पाण्याची हमी असते तेथे तागाचे पीक घेण्यात यावे.
- सर्व प्रकारच्या जमिनीत या खताची वाढ चांगली होत असली तरी आम्लधर्मीय जमिनीत या पीकांची वाढ जोमाने होत नाही.
- तसेच पाणी साचून राहणाऱ्या शेतात तागाची चांगली वाढ होत नाही.
- पावसाळ्याच्या सुरुवातीस तागाचे बी हेक्टरी ५० ते ६० किलो पेरावे.
- पेरणीनंतर ५ ते ६ आठवड्यांनी हे पीक फुलोऱ्यावर येण्याच्या सुमारास ६० ते ७० से.मी. उंच वाढली असतांना नांगराच्या सहाय्याने जमिनीत गाडून टाकावे.
- तागामध्ये नत्राचे प्रमाण ०.४६ टक्के असून या पिकापासून हेक्टरी ८० ते ९० किलो नत्र मिळते.

**२) धैंचा**

तागापेक्षा काटक असे हिरवळीचे हे पीक असून कमी पर्जन्यमान, पाणथळ, क्षारमय अथवा आम्लधर्मीय जमिनीत हे पिक तग धरु शकते.

- या वनस्पतीच्या मुळांवर तसेच खोडावरही गाठी दिसून येतात या गाठीमध्ये रायझोबियम जीवाणू सहजीवी नत्र स्थिरीकरणाच्या प्रक्रियेने हवेतील नत्राचे स्थिरीकरण करतात.
- या पिकांच्या लागवडीसाठी हेक्टरी २५ ते ४० किलो बियाणे पावसाळ्याच्या सुरुवातीस शेतात पेरावे.
- बियाण्याची उगवण लवकर होण्यासाठी त्यास गंधकाची प्रक्रिया करून परत थंड पाण्याने धुवावे आणि त्यानंतर रायझोबियम जीवाणू संवर्धनाची प्रक्रिय बियाण्यास करावी.
- पिकाच्या वाढीसाठी आवश्यकतेनुसार पाणीपुरवठा करून पीक ६ ते ७ आठवड्यात ९० ते १०० से.मी उंचीपर्यंत वाढले असता जमिनीत नांगराने गाडून टाकावे.
- या काळात धैंच्यापासून १० ते २० टनापर्यंत हिरव्या सेंद्रिय पदार्थाची निर्मिती होते. या वनस्पतीत नत्राचे शेकडा प्रमाण ०.४६ टक्के इतके आहे. भाताची लावणी करण्यापूर्वी आठ दिवस पीक जमिनीत गाडल्यास हेक्टरी ८० किलो नत्राची उपलब्धता होऊ शकते.

**हिरवळीच्या खताचे फायदे**- हिरवळीच्या खताचा मधील सेंद्रिय द्रव्यामुळे जमिनीतील सूक्ष्मजीवाणूंना अन्नद्रव्यांची उपलब्धता वाढते.

- लवकर कुजणारे हिरवळीची खते वापरल्यामुळे एकूण नत्र, उपलब्ध स्फुरदचे प्रमाण आणि ॲझोटोबॅक्टर सारख्या जिवाणूंचे प्रमाण वाढते.
- जमिनीच्या जलधारण क्षमता वाढते. त्याचप्रमाणे पावसाच्या पाण्यामुळे होणारी जमिनीची धूप कमी होते.
- सेंद्रिय पदार्थांमुळे माती रवेदार होण्यास मदत होते. त्यामुळे पावसाचे पाणी जमिनीत साचून राहता त्याचा निचरा लवकर होतो.
- हलक्या जमिनीत देखील सेंद्रिय पदार्थामुळे पाणी धारण क्षमता वाढते.
- काही हिरवळीची पिके हवेतील नत्र शोषून घेतात आणि ते नत्र जमिनीत साठवले जाऊन ते पुढील पिकांना उपलब्ध होते.
- क्षार जमिनीत हिरवळीचे पीक गाडल्यामुळे जमिनीतील क्षार कमी होऊन त्या जमिनी लागवडीसाठी आणता येतात.
- हिरवळीच्या खताचे पिके जमिनीत असेंद्रिय स्फुरदाचे सेंद्रिय स्फुरदात रुपांतर करतात व जमिनीतील स्फुरदाची उपलब्धता वाढवितात.
- हिरवळीच्या पिकांच्या दाट वाढीमुळे तणांचा नायनाट होण्यास मदत होते.

# आजपासून नवरात्रौत्सवाला सुरुवात , गरब्यावर राहणार पोलिसांचा वॉच! दामिनी पथके वाढविली

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३अमरावती** आज ३ ऑक्टोबरपासून नवरात्रोत्सवाला सुरुवात झाली असून, शहरात ४९२ ठिकाणी दुर्गादेवी व १०२ ठिकाणी शारदादेवीची स्थापना करण्यात आली आहे. यादरम्यान १२ ऑक्टोबरपर्यंत शहरात ६४ ठिकाणी गरबा कार्यक्रमाचे आयोजन केले जाणार आहे. त्यातील सर्वाधिक २२ ठिकाणी ही राजापेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील आहेत.

नवरात्रोत्सवावर शहर पोलिसांची करडी नजर असताना विशेषकरून गरबा कार्यक्रमावर खाकीचा करडा वॉच राहणार आहे. त्यासाठी पोलीस ठाणेनिहाय विशेष पथकासह दामिनी पथकेही वाढविण्यात आली आहेत. गरब्यावर सहा दामिनी पथकांचा वॉच राहणार आहे.



नवरात्र उत्सवात स्थापना व विसर्जन मिरवणूक व शोभायात्रेदरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधित राहणेकरीता पोलीस आयुक्तालयातर्फे असामाजिक तत्वाकडून कोणताही उपद्रव होणार नाही याकरीता, दुखापतीचे गुन्हे, मारामारी, छेडखानीवर प्रभावी प्रतिबंधक कारवाई करण्याबाबत सर्व ठाणेदार तसेच वरिष्ठ अधिकाऱ्यांना सुचित करण्यात आले आहे.

नवरात्रौत्सवासाठी १०३ पोलीस अधिकारी व १३५० अंमलदार तैनात असतील. शहरातील महत्वाचे चौक, गर्दीचे ठिकाणे, मिश्र व संवेदनशिल वस्तीच्या ठिकाणी फिक्स पॉईंस लावण्यात येणार आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेकरीता १२ सी आर मोबाईल, सहा दामिनी पथके, बीट मार्शल व डायल ११२ वी वाहने शहरात सतत गस्त करीत राहणार आहे. सोशल मिडियावरील पोस्टवर देखील सायबर पोलिसांचे २४ बाय ७ लक्ष असणार आहे.

> शहरातील नवरात्रौत्सव सुरळीत व सुरक्षित होणेकरिता सर्व शासकीय विभागांना त्यांच्या अधिनस्त असलेली कामे करण्याकरिता पत्र व्यवहार करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे पोलीस आयुक्तालयातील सर्व संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांना सर्व प्रकारची दक्षता घेण्याची सुचना करण्यात आली आहे. गरबा कार्यक्रमावर विशेष लक्ष असणार आहे.
> **– नवीनचंद्र रेड्डी**, पोलीस आयुक्त

पासपोर्ट फोटो घेणे

RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा -prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

गुरुवार दि. ३ ऑक्टोबर २०२४ शहर/ग्रामिण


# महात्मा गांधींचा जीवनप्रवास उलगडणारे दुर्मिळ छायाचित्र प्रदर्शन-जिल्हाधिकारी सौरभ कटियार



## नागरीकांनी व विद्यार्थ्यांनी मल्टिमीडीया छायाचित्र प्रदर्शनाला भेट देण्याचे आवाहन

### श्री संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन येथे ४ ऑक्टोबर पर्यंत चालणार प्रदर्शन

### नागरीकांसाठी नि:शुल्क प्रवेश

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३अमरावती –** महात्मा गांधी यांचा जीवनप्रवास उलगडणारे उत्कृष्ठ दुर्मिळ छायाचित्र प्रदर्शन असून नागरीक व विद्यार्थ्यांनी या प्रदर्शनाला आर्वजुन भेट देऊन माहिती जाणून घ्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी केले.

महात्मा गांधी जयंती निमित्त माहिती व प्रसारण मंत्रालय, भारत सरकारच्या केंद्रीय संचार ब्यूरो, क्षेत्रीय कार्यालय, अमरावती, जिल्हा प्रशासन अमरावती, जिल्हा परिषद अमरावती, महानगरपालिका अमरावती, पोलिस अधिक्षक कार्यालय अमरावती, महिला व बालविकास विभाग, जि. प. अमरावती, जिल्हा माहिती कार्यालय, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने मोर्शी मार्गावरील श्री संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन येथे महात्मा गांधीचा जीवनप्रवास या विषयावर आधारित मल्टिमीडीया छायाचित्र प्रदर्शनाचे उदघाटन जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांच्या हस्ते झाले. त्यावेळी सभागृहात आयोजित केलेल्या मल्टिमीडीया छायाचित्र प्रदर्शन उदघाटन समारंभ व अंगणवाडी सेविका, मदतनीस व पर्यवेक्षिका यांचा सत्कार सोहळ्यात ते बोलत होते.

याप्रसंगी पोलिस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी, महानगर पालिका आयुक्त सचिन कलंत्रे, केंद्रीय संचार ब्यूरोचे क्षेत्रीय प्रचार अधिकारी हंसराज राऊत, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष जोशी, जिल्हा परिषदेच्या महिला व बाल विकास विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी कैलास घोडके, जिल्हा माहिती अधिकारी गजानन कोटुरवार, बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता दिनेश गायकवाड, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) बाळासाहेब बायस, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) बुध्दभूषण सोनवणे, बालविकास प्रकल्प अधिकारी सर्वश्री विलास दुर्गे, अतुल भडांगे, नारायण तेरे प्रामुख्याने उपस्थित होते.

जिल्हाधिकारी कटियार पुढे म्हणाले की, महात्मा गांधी यांच्या जीवनाबद्दलची संपूर्ण माहितीचे उत्कृष्ठ संकलन करून छायाचित्र व माहितीच्या स्वरूपात मांडणी करण्यात आली आहे. एखादे पुस्तक वाचल्यावरच गांधीजींची माहिती आपल्याला कळते. मात्र प्रदर्शनाच्या माध्यमातून त्यांच्या संपुर्ण जीवन प्रवासाची माहिती मिळत आहे. त्यामुळे नागरीकांनी प्रदर्शनाला आवर्जुन भेट द्यावी, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.



पोलिस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी म्हणाले की, महात्मा गांधी यांच्या जीवनावर आधारीत उत्कृष्ठ अशी प्रदर्शनी लावण्यात आली असून नवीन पिढी व विद्यार्थ्यांसाठी अमुल्य अशी माहिती आहे. विद्यार्थ्यांनी या प्रदर्शनाला भेट देऊन माहिती जाणून घेण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.

महानगरपालिका आयुक्त सचिन कलंत्रे म्हणाले, महात्मा गांधी यांचे व्यक्तिमत्व सर्वांना प्रेरणादायी आहे. या प्रदर्शनात त्यांच्या जीवनावर आधारीत असलेल्या विविध घटनाक्रमांची माहिती मांडण्यात आली आहे. विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परीक्षांच्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त अशी माहिती आहे. त्यामुळे प्रदर्शनाला भेट देऊन माहिती जाणून घ्यावी, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मनोगत केंद्रीय संचार ब्युरोचे क्षेत्रीय प्रचार अधिकारी हंसराज राऊत व महिला व बाल विकास विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी कैलास घोडके यांनी केले. संचालन शिप्रा मानकर, आभार प्रदर्शन बालविकास प्रकल्प अधिकारी नवनाथ घनतोडे यांनी केले. कार्यटक्रमाच्या यशस्वितेसाठी केंद्रीय संचार ब्यूरोचे सहायक क्षेत्रीय प्रचार अधिकारी शशिकांत पटेल, एमटीएस सागर लाडोळे यांच्यासह इतरांनी परिश्रम घेतले.

अंगणवाडीसेविका, मदतनीस व पर्यवेक्षिका यांचा सत्कार

यावेळी कार्यक्रमात पोषण माह मध्ये उत्कृष्ठ कार्य केल्याबद्दल अमरावती जिल्ह्याचा राज्यात तिसरा क्रमांक मिळाल्याबद्दल उत्कृष्ठ कार्य करणा-या अंगणवाडी सेविका, मदतनीस व पर्यवेक्षिका यांचा जिल्हा परिषदेच्या महिला व बालविकास विभाग मार्फत सत्कार करण्यात आला. यावेळी जिल्हाधिकारी सौरभ कटियार, पोलिस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी, महानगर पालिका आयुक्त सचिन कलंत्रे हस्ते महिला व बालविकास विभागाच्या खालील युनीटचा सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला. १.अमरावती २.अंजनगाव सूर्जी ३. अचलपूर ४.भातकुली ५. धारणी ६. चिखलदरा ७.चांदुर बाजार ८.नांदगाव खंडेश्वर ९. चांदुर रेल्वे १०.तिवसा ११.धामणगाव १२. मोर्शी १३. वरूड १४. दर्यापूर १५.नागरी पशिम १६.नागरी उत्तर १७.नागरी दक्षिण १८.नागरी पूर्व

# प्राचीन लोकोत्सवाचे महात्म्य: नवरात्रोत्सव का साजरा करतात ? नवरात्रात नेमके काय करावे ?

**विदर्भ प्रजासत्ताक**

मराठी वर्षात अनेक वैविध्यपूर्ण सण-उत्सव, व्रत-वैकल्ये केली जातात. यामध्ये चातुर्मास विशेष महत्त्वाचा मानला जातो. विद्यमान घडीला सुरू असलेल्या चातुर्मासात नवरात्रोत्सव साजरा केला जात आहे. मराठी वर्षात अनेक नवरात्रोत्सव साजरे केले जातात. पैकी अश्विन महिन्यातील प्रतिपदेपासून ते विजयादशमी या कालावधीतील नवदुर्गा देवीच्या नवरात्राला विशेष महत्त्व असल्याचे सांगितले जाते.

यादेवी सर्वेभूतंषू मातृरूपेण संस्थितः। नमस्तस्यै नमस्तस्यै नमस्तस्यै नमो नमः।। नवरात्र हा सण फार प्राचीन काळापासून चालत आलेला आहे. प्रारंभी तो एक कृषिविषयक लोकोत्सव होता. पावसाळ्यात पेरलेले पहिले पीक घरात आल्यावर शेतकरी हा उत्सव साजरा करीत असे. नवरात्रात घटस्थापनेच्या दिवशी घराखालच्या स्थंडिलावर नऊ धान्याची पेरणी करतात व दसऱ्याच्या दिवशी ते धान्यांचे वाढलेले अंकुर उपटून देवाला वाहतात. ही प्रथा या सणाचे कृषिविषयक स्वरूप व्यक्त करते. तसेच या उत्सवाचे धार्मिक महत्त्व अनन्य साधारण असून, नवरात्राचा काळ भगवती देवीच्या उपासनेसाठी विशेष महत्त्वाचा मानला जातो.

अश्विन या पवित्र महिन्यात भक्तीपूर्वक देवीची आराधना

नवरात्राला अकालबोधन नवरात्र असे म्हटले जाते. नवरात्रात विशेषकरून देवीची उपासना करायला पाहिजे. अश्विन या पवित्र महिन्यात भक्तीपूर्वक देवीची आराधना व्हायला पाहिजे. नवरात्रात देवीच्या नऊ रुपांचे पूजन, स्मरण केले जाते. भगवतीच्या पहिल्या रूपाला शैलपुत्री असे म्हणतात. दुसऱ्या रूपाला ब्रह्मचारिणी, तिसऱ्याला चन्द्रघण्टा, चौथ्याला कृष्मांडा, पाचव्याला स्कंदमाता, सहाव्याला कात्यायनी, सातव्याला कालरात्री, आठव्याला महागौरी आणि नवव्याला सिद्धीदात्री अशा या नऊ दिवसात निरनिराळ्या नऊ रूपांमध्ये ती वावरत असते आणि दहाव्या दिवशी ती शुभनिशुंभ या राक्षसांचा वध करण्यास समर्थ होण्यासाठी सीमा उल्लंघन करते. अशा या देवीचे हे नऊ रूप आपण बघितल्यानंतर, तिचे जे नऊ दिवसांचे आपल्या घरातले जे मंगलमय वास्तव्य असते, त्यात कोणी उपवास एकभुक्त व्रत किंवा यापैकी एका व्रताचा नियम करून तिची आराधना केली जाते.

### देवी भागवतात काय वर्णन आढळून येते ?

जगात जे काही अनेक व्रत किंवा अनेक दान आहे, त्याची या नवरात्र व्रताशी तुलना कधीच होऊ शकत नाही. हे व्रत धनधान्य, सुखसंपत्ती, पुत्रपौत्र, आरोग्यवर्धक आणि स्वर्ग व मोक्षाची प्राप्ती करून देण्यास समर्थ आहे. ज्यांना विद्या, धन मिळण्याची इच्छा आहे, त्यांनी या सौभाग्यदायी मंगलमय व्रताचे अनुष्ठान मांडावे. विद्येची आवड असणाऱ्या मनुष्याने हे व्रत केल्यास त्याला विद्येची प्राप्ती होते. ज्याचे राज्य नष्ट झाले, त्याला पुन्हा राज्याची प्राप्ती होऊ शकते, असे वर्णन श्री देवी भागवतात केले आहे.



नवरात्र आणि कुमारिका पूजन

नवरात्रामध्ये हवन यज्ञाला आपल्या पूर्वजांपासून एवढे महत्त्व प्राप्त झाले आहे. ज्या कुमारिकांना भोजन दिले जाते त्यांना त्यांच्या वयानुसार देवीच्या वेगवेगळ्या रूपांनी संबोधिले जाते. कुमारिका कमीत कमी दोन वर्षांची असली पाहिजे. त्याआधी तिचे पूजन चालत नाही. तीन वर्षांच्या कुमारीला त्रिमूर्ती, चार वर्षाच्या कुमारिकेला कल्याणी, पाच वर्षाच्या कुमारीला रोहिणी, सहा वर्षाच्या कालिका, सात वर्षांच्या कुमारिला चण्डिका, आठ वर्षाच्या कुमारीला शांभवी, नऊ वर्षाच्या कुमारीला दुर्गा आणि दहा वर्षाच्या कुमारीला सुभद्रा याच्या वरच्या वयाच्या कुमारीचे पूजन करण्याचा प्रघात नाही. कुमारी पूजनाचे फळ असे आहे की, दुःख दारिद्र्य नाहीसे होऊन शत्रूंचा नाश होते. यावरून भारतीय संस्कृतीमध्ये स्त्रीचे महत्त्वदेखील अधोरेखित होते.

### नवरात्र, चार कार्य आणि सांगोपांग व्रतपूर्ण

दक्षाच्या यज्ञामध्ये देवी भद्रकालीचा अवतार अष्टमीला झाला. तिचा आकार प्रचंड अवाढव्य होता आणि तिच्याच बरोबर असंख्य योगींनींचाही समावेश होता म्हणून अष्टमीला जो यज्ञ करण्याचा प्रघात आहे त्यात हवन ब्राह्मण भोजन कुमारिका भोजन फळ, फूल आणि वेगवेगळ्या प्रकारच्या दानांनी जगदंबेला प्रसन्न करण्यात येते तसेच ज्यांना नवरात्रात नऊ दिवस उपवास करणे शक्य होत नाही, त्यांनी तीन दिवस उपवास करूनही त्यांना यथोचित फळ मिळू शकते. सप्तमी, अष्टमी आणि नवमी या तीन रात्री उपाशी राहून देवीची पूजा केली, तर त्यांना फळ प्राप्ती होऊ शकते. देवीचे पूजन, होम, कुमारी पूजन आणि ब्राह्मण भोजन या चार प्रकारच्या कार्याने यथोचित पूजन केले, तर नवरात्राचे सांगोपांग व्रतपूर्ण होते, अशी आख्यायिका आहे.

## आ.देवेंद्र भुयार म्हणतात....
# राजकीय द्वेषातून तो व्हिडिओ व्हायरल

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३अमरावती –** विरोधकांनी कितीही द्वेष केला. जुने विडिओ काढून विपर्यास केला तरी मी कायम माझ्या माय माऊलींच्या सन्मानासाठी आग्रही राहिले आहे... पण राजकीय हेतूने वेडावलेल्या विरोधकांनी जो विडिओ फिरवलाय त्यांचा संदर्भ लक्षात न घेता केवळ राजकीय द्वेषातून हा व्हायरल झाला असल्याचे आ.देवेंद्र भुयार यांनी सांगितले.



शेतकऱ्यांच्या मुला मुलींच्या लग्नांच्या बाबतीत सध्या काय वास्तव आहे?गावगाड्यातील हे विदारक वास्तव मांडण्याचा हा प्रयत्न होता. तरीही माझ्या सदर विधानांनी माझ्या माय मावळ्यांचे मन दुखावले असेल.. तर मी दिलगिरी व्यक्त करतो. कारण एखाद्या वेळी माझ्या बोलण्याने समाजातील माझी बहीण, माझी आई दुखावली असेल तर एक मुलगा म्हणून, भाऊ म्हणून त्यांची माफी मागण्यास मी तसूभरही कमी करणार नाही. कारण त्यांच्या विश्वास आणि प्रेमावरच सामान्य घरातला मी इथपर्यंतची वाटचाल करु शकलोय याची स्पष्ट जाणीव मला आहे. ती कायम राहील असेही आ.भुयार म्हणालेत.

# राजकीय घडामोडींना आजपासून येणार वेग ; बैठकींचे सत्र होणार सुरु

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३मुंबई :** निवडणूक तोंडावर आली असतानाही पितृपक्षामुळे रखडलेल्या राजकीय घडामोडींना आज, गुरुवारपासून वेग येणार आहे. पक्षांतर, जागावाटप, प्रचार दौरे यासाठी तिष्ठत राहिलेली नेतेमंडळी घटस्थापनेच्या मुहूर्तापासून आपले राजकीय 'रंग' दाखवण्यास सुरुवात करण्याची शक्यता आहे. त्यातच येत्या दहा दिवसांमध्ये विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता कधीही लागू होण्याची शक्यता असल्याने सरकारदरबारीही निधी मंजुरी आणि कामांच्या घोषणा करण्याची घाई असून शुक्रवारी राज्य मंत्रिमंडळाची बैठक होणार आहे.



महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता ८ ऑक्टोबर रोजी जम्मू आणि काश्मीर तसेच हरियाणा या राज्यांच्या विधानसभांचे निकाल जाहीर झाल्यावर कधीही लागू होण्याची शक्यता आहे. शिवसेनेच्या (ठाकरे) दसरा मेळाव्यावर बंधने यावीत या दृष्टीने आचारसंहिता दसऱ्यापूर्वी म्हणजे १२ ऑक्टोबरच्या आधी लागू शकते, अशी कुजबुज आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी शनिवार, ५ ऑक्टोबर रोजी मुंबई, ठाण्याच्या दौऱ्यावर येत आहेत. मेट्रो-३ प्रकल्पाच्या उद्घाटनाबरोबरच ठाण्यातील विविध प्रकल्पांचे भूमिपूजनही त्यांच्या हस्ते होणार आहे. या कार्यक्रमातून महायुती आचारसंहितेपूर्वी भव्य शक्तिप्रदर्शन करण्याच्या तयारीत आहे. मोदी यांचा या दौऱ्यातून महायुतीच्या प्रचाराचा नारळ फुटण्याची शक्यता आहे.

मुंबई आणि कोकणच्या भाजप पदाधिकाऱ्यांच्या बैठकीसाठी आलेले केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी मंगळवारी रात्री उशिरापर्यंत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांच्याशी महायुतीतील जागावाटपा बाबत चर्चा केली. राष्ट्रवादी काँग्रेसचे खासदार प्रफुल पटेल यांनीही शहा यांच्याशी बुधवारी सकाळी या संदर्भात चर्चा केली. भाजप १५५ जागा लढवण्यावर ठाम आहे. मात्र शिंदे आणि अजित पवार यांनी आपल्या वाटयाला अधिक जागा याव्यात, असा आग्रह धरल्याचे समजते. मतदारांकडून फटका बसण्याच्या शक्यतेने अनेक जण पक्षांतराच्या तयारीत आहेत. मात्र गणेशोत्सव व त्यानंतर राजकीय मंडळींकडून अशुभ मानला जाणारा पितृपंधरवडा यांमुळे या घडामोडी थंडावल्या होत्या. आता घटस्थापनेपासून अशा मंडळींच्या पक्षांतराच्या माळा लागण्याची शक्यता आहे.

### मंत्रिमंडळाची आजही बैठक

राज्य मंत्रिमंडळाच्या दोन आठवडयांमध्ये झालेल्या बैठकांमध्ये १०० पेक्षा अधिक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. तसेच अनेक शासन निर्णय जाहीर करण्यात आले. आता गुरुवारी होणाऱ्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत विविध समाजघटकांना खूश करण्यासाठी कोणते निर्णय घेतले जातात, याकडे लक्ष लागले आहे. मंत्रालयात सध्या कामे मंजूर करण्याबरोबरच निधीचे प्रस्ताव मंजूर करण्यासाठीही गर्दी होत आहे.

# टाकरखेडा संभू येथील ३५० वर्ष पुरातन सती रेणुका माता मंदिर

**संतोष शेंडे**

**टाकरखेडा संभु –** पुरातण काळातील म्हणजे ३०० ते ३५० वर्षापुर्वी भातकुली तालुक्यातील टाकरखेडा संभु येथे सती रेणुका मातेची स्थापना करण्यात आली होती,हे जागृत देवस्थान असून

ही देवी पंचक्रोशीतील नागरिकांचे श्रध्दास्थान आहे. नवरात्रोत्सवानिमित्य येथे देवीच्या दर्शनासाठी भक्तांची गर्दी असते. यंदा देखील नवरात्री उत्सवा दरम्यान येते भक्तांची मांदियाळी राहणार आहे,

येथील वयोवृद्ध लोकांच्या सांगण्याप्रमाणे रेणुका माता ही एक गोसावी माते पोटी जन्माला आली आहे. या देवीचा दैवी शक्तीचा गावातील अनेक लोकांना अनुभव आला असल्याचे बोलले जाते.देवीला कोणीतरी एक गाय दान दिली होती.काही दिवसाने त्या गाईने एक गोरा जन्माला घातला.ती गाय मोकाट होती.तिला कोणीही चारा पाणी द्यायचे.तिच्या उत्पन्नावर या मंदिराचा जिर्णोध्दार झाला आहे. कालांतराने यावले या घराण्यात काही चमत्कार घडला.देवीची कृपा झाली,या श्रध्देमुळे त्यांनी दोन एकर शेत मंदिराला दान दिले.त्यानंतर या मंदिराची पंच कमेटीसुध्दा तयार करण्यात आली आहे. या कमेटीव्दारे आता मंदिराचा कारभार बघितला जातो.



नवरात्र विशेष

प्रभाकर बापु देशमुख हे मंदिराचे अध्यक्ष असतांना त्यांच्या कार्यकाळामध्ये मंदिराचे बांधकाम सुरु झाले.त्यानंतर गजानन बोबडे हे अध्यक्ष झाले.त्यांनी सुध्दा मंदिराचा कारभार योग्य प्रकारे चालविला. मधल्या काळात दिलीप महादेव वानखडे ज्यांच्याकडे अध्यक्षपदाची धुरा देण्यात आली होती, सध्या गजानन बोबडे हे पुन्हा अध्यक्ष झाले असून दिलीप वानखडे हे या संस्थेचे सचिव आहे,

या रेणुका मातेची अनेकांना प्रचिती असल्याचे सांगितले जाते.महादेव बोबडे यांच्या घरातील सदस्याची प्रकृती चिंताजनक होती,त्यांनी रेणूका मातेच्या नावाचा अंगारा रुग्णाला लावला.नंतर अवघ्या पाच तासात त्यांची प्रकृती बरी झाली.दवाखाणन्यात जावे लागले नाही.असे बोबडे कुंटूबियांचे म्हणणे आहे. भाऊराव अडीवकर यांच्या स्वप्नात येवून देवीने त्यांच्या डोक्यावर हात ठेवला आणी त्यांना आशिर्वाद दिला,असे अडिवकर यांनी सांगितले. असे अनेक चमत्कार येथे घडल्याचे वृद्ध नागरिक सांगतात नवरात्रोत्सवानिमित्य येथे सात दिवस देवीचा उत्सव साजरा केला जातो.विविध कार्यक्रम होतात.गावातुन भव्य शोभा यात्रा निघते.येथे ५४ वर्षापासुन पुंडलीक महाराज जयंती सुध्दा साजरी केली जात आहे. शिवराव देशमुख, कृष्णराव चितोडे, काशिराव, सुधाकरराव सातनुरकर, नारायनराव अडीवकर या सर्व लोकांनी येथे पुंडलीक महाराज जयंती यांचा हा कार्यक्रम सुरु केला.सात दिवस धार्मिक कार्यक्रम,गावातुन श्री पुंडलीक महाराजाची शोभा यात्रा काढली जाते.नंतर गाव पंगत होते. संपूर्ण गाव या कार्यक्रमामध्ये सहभागी होवून हातभार लावते.येथे नवरात्रात नऊ दिवस फार आनंदात जातात. नवरात्रीमध्येही मोठ्या प्रमाणात अन्नदान केले जाते.तर रोज पहाटे ४वाजता रेणुका माता मूर्तिचा दही दुधाने अभिषेक केला जातो,टाकरखेडा संभु गावातील रेणुका माता हे जागृत देवस्थान असल्याची दृढ श्रध्दा आहे.

# राज्यात पेसा क्षेत्रातील भरती करा; मंत्रालयात आदिवासी उमेदवारांचा ठिय्या

## यवतमाळात साखळी उपोषण, १३ जिल्ह्यांत १७ संवर्गातील भरती रखडली

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३अमरावती :-** राज्यातील पेसा क्षेत्रातील १३ जिल्ह्यांत १७ संवर्गांमधील अंतिम शिफारस प्राप्त आदिवासी उमेदवारांना अद्यापर्यंत नियुक्ती आदेश मिळालेले नसल्यामुळे ३० सप्टेंबरपासून बेरोजगार आदिवासी उमेदवारांनी मंत्रालयाच्या बाहेरच ठिय्या मांडला आहे. मुलांजवळ पैसे नसल्यामुळे ते उपाशीपोटीच उघड्यावर मंत्रालयाबाहेर झोपले आहेत. तर यवतमाळात गत आठ दिवसांपासून आदिवासी उमेदवार साखळी उपोषणाला बसले आहेत.

पेसा भरतीचा प्रश्न सोडविण्यासाठी शासन सकारात्मक आहे. पेसा क्षेत्रातील बेरोजगार आदिवासी उमेदवारांना १५ सप्टेंबरपर्यंत नियुक्ती आदेश देण्यात येईल, अशी ग्वाही खुद्द मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी २९ ऑगस्ट रोजी सह्याद्री अतिथी गृहावर पार पडलेल्या बैठकीत आदिवासी शिष्टमंडळाला दिली होती. मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या शब्दावर विश्वास ठेवून अंतिम शिफारस प्राप्त आदिवासी उमेदवारांना १५ सप्टेंबरपर्यंत नियुक्ती आदेश मिळेल, या आशेने आदिवासींच्या शिष्टमंडळाने सरकारला



सकारात्मक प्रतिसाद देत १ ऑगस्टपासून नाशिक व इतरही आदिवासीबहुल जिल्ह्यात सुरू असलेले उपोषण मागे घेतले होते. मात्र, अद्यापही अंतिम शिफारस झालेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेश मिळालेले नाहीत. त्यामुळे अनुसूचित क्षेत्रातील बेरोजगार आदिवासी उमेदवारांनी ३० सप्टेंबरला मंत्रालय गाठले. शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने १३ ऑक्टोबर २०२३ रोजी आणि महसूल व वन विभागाने १७ ऑक्टोबर रोजी पत्र काढून अनुसूचित क्षेत्रातील संपूर्ण भरती प्रक्रिया थांबविली आहे.

### यवतमाळातही साखळी उपोषण

पेसा क्षेत्रातील शिफारस पात्र उमेदवारांना नियुक्ती आदेश मिळण्यात यावे, यासाठी यवतमाळ येथील जिल्हा परिषदेसमोर २५ सप्टेंबरपासून आदिवासी उमेदवारांनी बेमुदत साखळी उपोषण सुरू केले आहे. या उपोषणाला आठ दिवस झाले आहेत. गौरव गेडाम, अशोक आत्राम, आकाश मेश्राम, सूर्यकांत पेंदोर, वैभव कुडमथे, पंकज पेंदोर, रोहित मरसकोल्हे, बादल मडावी, मनोज गेडाम, रोशन चांदेकर, गोपाळ बोरीकर, अतुल कुळसंगे, शुभांगी पेंदोर, स्नेहा आडे, काजल किनाके, कल्याणी चांदेकर, पूजा मडावी, भाग्यश्री आत्राम, प्रांजली आत्राम, शीला अर्के आदी बेरोजगार आदिवासी उमेदवार उपोषणाला बसले आहेत.

त्यामुळे आदिवासी लोकसंख्येच्या प्रमाणात १०० टक्के, ५० टक्के आणि २५ टक्के आरक्षित असलेली पदे अद्यापही रिक्त आहे. बिगर आदिवासी उमेदवारांना सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिनस्त राहून नियुक्त्या देण्यात आलेल्या आहेत. मात्र, यातून केवळ आदिवासी उमेदवारांना वगळण्यात येऊन भेदभाव करण्यात आला आहे. पेसा क्षेत्रातील १७ संवर्गाची कायमस्वरूपी पदभरती तत्काळ करण्यात यावी. शिफारस पात्र उमेदवारांना नियुक्ती आदेश देण्यात यावेत, यासाठी आदिवासी उमेदवार मंत्रालयात ठाण मांडून बसले आहे.

## अमरावती, दर्यापूर, बडनेरा, मोर्शी-वरुड मतदारसंघात

# भाजपतर्फे गुप्त मतदानाद्वारे भावी उमेदवारांची चाचपणी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३ अमरावती** -केंद्रीय गृहमंत्री व वरिष्ठ भाजप नेते अमित शाह यांच्या निर्देशांनुसार शुक्रवार ४ किंवा शनिवार ५ ऑक्टोबरला अमरावती, दर्यापूर, बडनेरा व मोर्शी-वरुड मतदारसंघातील भाजपचे भावी उमेदवार कोण? यासाठी प्रत्येक विधानसभा मतदारसंघांतील पदाधिकाऱ्यांकडून गुप्त मतदानाद्वारे चाचपणी होणार आहे.याचाच अर्थ विधानसभा निवडणुकीसाठी भाजप उमेदवार निश्चित करण्यापूर्वी मतदार संघातील पदाधिकाऱ्यांच्या मताचाही विचार करणार आहे. इच्छुक उमेदवारांचे नाव अंतिम करण्यापूर्वी त्या-त्या मतदार संघातील भाजप पदाधिकाऱ्यांचे मत मागितले जायचे. परंतु,




यावेळी पद्धत बदलली असून, बंद लिफाफ्यात उमेदवारांचे नाव १, २, ३ अशा पसंतीक्रमानुसार मागून ते लिफाफे नागपुरात पक्षश्रेष्ठींना पाठवले जात आहेत. नागपुरात २४ सप्टेंबरला अमित शाह यांनी विधानसभा मतदारसंघांत काम करण्यासाठी भाजप पदाधिकारी व कार्यकर्त्यांपुढे १४ मुद्दे ठेवले असून, भावी उमेदवारांची निवड हा त्यातील मुळ मुद्दा आहे. लाडकी बहिण अंतर्गत महिला मेळावे झाले की नाहीत, विश्वकर्मा योजनेंतर्गत सत्कार झाला की नाही, याचाही त्यात समावेश आहे. पहिल्या टप्प्यात जिल्ह्यातील धामणगाव रेल्वे, अचलपूर, तिवसा व मेळघाटात चाचपणी केली.निरीक्षक आ. संजय कुटे यांच्या उपस्थितीत मेळघाटात झालेल्या चाचपणीत ११८, निरीक्षक माजी महापौर किरण महल्ले यांच्या उपस्थितीत तिवसा येथे झालेल्या चाचपणीत १७८, धामणगाव रेल्वे येथे निरीक्षक आ. विजय रहांगडाले यांच्या उपस्थितीत २३२, अचलपूर येथे निरीक्षक अनुप धोत्रे यांच्या उपस्थितीत १८३० पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी मतदान केले. हे लिफाफे सीलबंद केले असून, ते नागपुरात पक्षश्रेष्ठींकडे पाठवल्याची माहिती भाजपचे जयंत डेहनकर यांनी दिली.

# महिला सरपंचाने स्वतःला जमिनीत घेतले गाडून!

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३बुलढाणा :** एरवी शासकीय अधिकारी, कर्मचारी हे ग्रामस्थ किंवा जन सामान्यासोबत साहेबगिरीच्या अविर्भावात वागतात. त्यांचा पाणउतारा करतात, टोचून कडक बोलतात असा सर्वांचा अनुभव आहे. अगदी कुणी अन्यायाविरुद्ध आंदोलन केले तरी तिकडे लवकर ते ढुंकूनही पाहत नाही, असे परिस्थिती सगळीकडे आहे. मात्र, बुलढाणा जिल्ह्याच्या आदिवासी बहुल संग्रामपूर तालुक्यातील एका महिला सरपंचांनी असा काही



'आंदोनात्मक हिसका' दाखविला की 'साहेब' थेट आंदोलनाच्या दारी आले.

बुधवारी (२ ऑक्टोबर) हे अनोखे आंदोलन करण्यात आले. आंदोलन सुरू झाल्यावर काही तासांतच साहेब दूरवरच्या आंदोलनस्थळी धावत आले आणि महिला सरपंच आणि गावकऱ्यांची मागणी तत्काळ मार्गी लावली. सुवर्णा गणेश टापरे असे या महिला रणरागिणीचे नाव असून त्या आदिवासी बहुल आणि विकासापासून वंचित संग्रामपूर तालुक्यातील काथरगाव पिंपरी या ग्रामपंचायतीच्या लोकनियुक्त सरपंच आहेत. त्यांनी आपले सहकारी उपसरपंच, सदस्य यांच्या समवेत आज, अहिंसक आंदोलनाचे प्रणेते, राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंतीच्या मुहूर्तावर स्वतःसह आपल्या सहकाऱ्यांना जमिनीत अर्धे गाडून घेतले. त्यांचा आणि गावकऱ्यांचा संताप अनावर व्हायला कारणही तसेच आहे.

# 'एनएचएम' कर्मचाऱ्यांची राज्य ज्येष्ठता यादी घोषित

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३अमरावती-** आरोग्य सेवेच्या नव्या भरतीत ३० टक्के जागा राखीव ठेवण्याच्या निर्णयाला पुरक ठरणारी राष्ट्रीय आरोग्य मिशनमधील कर्मचाऱ्यांची राज्यस्तरीय ज्येष्ठता यादी प्रकाशित झाली. त्यावर सूचना व हरकती मागवल्या आहेत. 'दिव्य मराठी'ने दोन दिवसांपूर्वीच अशी घडामोड होणार असून, एक-दोन दिवसांत यादी घोषित होईल, असे प्रकाशित केले होते, हे विशेष. एनएचएममध्ये काम करणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांना तोकडे मानधन मिळते. शासकीय सेवेतील डॉक्टर, परिचारिकां सारखीच पूर्णवेळ कामे करून त्यांना कंत्राटी कर्मचारी म्हणूनच वागवले जाते. त्यामुळे या कर्मचाऱ्यांनी गेल्या वर्षी ४७ दिवसांचा संप केला होता. हा संप सोडवताना या कर्मचाऱ्यांपैकी दहा वर्षे सेवा पूर्ण झालेल्या अधिकारी -कर्मचाऱ्यांस ाठी नव्या भरतीत ३० टक्के जागा राखीव ठेवण्याचे शासनाने मान्य केले होते. त्यामुळे प्रत्येक जिल्हा पातळी वर या कर्मचाऱ्यांची सेवा ज्येष्ठता यादी करण्याचे काम हाती घेतले जिल्ह्यात एनएचएमचे दीड हजार अधिकारी-कर्मचारी आहेत. त्यापैकी ५०६ अधिकारी - कर्मचारी हा निकष पूर्ण करतात. त्यामुळे त्यांची यादी शासनाकडे पाठवली. येत्या आठवडाभरात हरकती व सूचना मागविण्यात आल्या आहेत.

### टीएमओंना पाठवले पत्र

एनएचएमच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांची राज्यस्तरीय यादी प्रकाशित झाली. त्यानुसार तालुका वैद्यकीय अधिकाऱ्यांना (टीएमओ) पत्र लिहले असून त्या-त्यारुग्णालयातीलकर्मचाऱ्यांनी यादी पाहून हरकती वसूचना दाखल कराव्या, अशा सूचना देण्यात आल्या आहेत.**डॉ. सुरेश असोले, जिल्हा आरोग्य अधिकारी**

# पाच महिन्यात जिल्ह्यात ९५५ जणांना सर्प दंश

## जिल्हा सामान्य रुग्णालयात ५०६ रुग्णांवर उपचार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३अमरावती** - पावसाळ्याच्या दिवसात सर्वात जास्त सर्पदंशाच्या घटना उघडकीस येत असते. अमरावती जिल्ह्यात सर्प दंशाच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. पाच महिन्यांमध्ये अमरावती जिल्ह्यात ९५५ जणांना साप चावला आहे. यामध्ये ९ जणांचा उपचारा दरम्यान मृत्यू झाल्याची नोंद जिल्हा आरोग्य प्रशासनाने केली आहे.

या आकडेवारीनुसार जिल्ह्यात रोज सरासरी सात नागरिकांना सर्पदंश होत असल्याचे दिसून येते. सर्पदंशाच्या सर्वाधिक घटना या ग्रामीण भागातल्या असल्या, तरी सर्वाधिक ५०५ रुग्ण हे उपचारासाठी जिल्हा सामान्य रुग्णालय (इर्विन) येथे भरती झाले होते. पावसाळ्याच्या दिवसांमध्ये सर्पदंशाच्या घटनांमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ होते. ग्रामीण भागात सर्पदंशाच्या घटना सर्वाधिक होतात. सर्पदंश झालेल्या व्यक्तीला तातडीने उपचार मिळणे गरजेचे असते. त्यामुळे प्राथमिक आरोग्य केंद्र, तसेच उपकेंद्रामध्ये ही सर्पदंशावरील उपचारासाठी



आवश्यक असलेली सर्व औषधे पुरविण्यात येतात; परंतु बहुतांश आरोग्य केंद्रात उपचाराच्या सुविधा असतानाही येथील डॉक्टर उपचार न करताच, संबंधित रुग्णांना ग्रामीण रुग्णालय किंवा जिल्हा सामान्य रुग्णालयात रेफर करतात. त्यामुळे उपचारासाठी होणाऱ्या विलंबामुळे रुग्णांची प्रकृती गंभीर होऊन त्यांना आपले प्राण गमावण्याची वेळ येते. मे ते सप्टेंबर या पाच महिन्यांमध्ये ९५५ जणांना झालेल्या सर्पदंशामध्ये नऊ नागरिकांना आपले प्राण गमवावे लागले आहेत. यामध्ये सर्वाधिक आठ जणांचा मृत्यू इर्विन रुग्णालयात उपचारादरम्यान झाल्याची नोंद आहे.

**३७१ रुग्णांना चावला विंचू**

सर्पदंशाबरोबर जिल्ह्यात विंचूदंश झालेल्या नागरिकांची नोंदही रुग्णालय प्रशासनाकडे आहे. याच पाच महिन्यांत ३७१ नागरिकांना विंचूदंश झाला आहे.

# १.८५ लाख शेतकऱ्यांना हेक्टरी पाच हजार अनुदान

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि ३ अमरावती :**शेतकरी गतवर्षीच्या कपाशी सोयाबीनला भाव न मिळाल्याने भावांतर योजनेच्या माध्यमातून हेक्टरी पाच हजार व दोन हेक्टर मर्यादेत अनुदान दिले जात आहे. जिल्ह्यात आतापर्यंत १,८४,५४४ शेतकऱ्यांनी कृषी सहायकाकडे ई-केवायसी केली असल्याने त्यांच्या खात्यात पेरणी क्षेत्राच्या अनुषंगाने अर्थसाहाय जमा होत आहे. त्यामुळे सणासुदीत शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे.

मागच्या हंगामात सरासरीपेक्षा कमी पावसाने सरासरी उत्पन्नात कमी आली आहे. आंतरराष्ट्रीय घडामोडीमुळे शेतमालास हमीभावदेखील मिळाला नाही. त्यामुळे राज्य शासनाने भावांतर योजनेच्या माध्यमातून दोन हेक्टर मर्यादत हेक्टरी पाच हजार देण्याची घोषणा केली होती, त्याची अंमलबजावणी दोन दिवसांपासून सुरू झालेली आहे. गतवर्षी ई-पीक पाहणी केलेल्या ३,५३,६८३ शेतकऱ्यांच्या याद्या जमाबंदी विभागाने कृषी विभागाला पुरविल्या होत्या व यामध्ये नावे असलेल्या शेतकऱ्यांची ई-केवायसी करण्याची प्रक्रिया सध्या जिल्ह्यात सुरू आहे. शासनाद्वारा २९ सप्टेंबरपासून शेतकऱ्यांच्या खात्यात अर्थसाहाय्य जमा करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले होते. मात्र, प्रत्यक्ष बँक खात्यात जमा होण्याची प्रक्रिया ३० पासून सुरू झाली आहे. अद्याप ४६,२४६ शेतकऱ्यांनी ई-केवायसीची प्रक्रिया केली नसल्याची माहिती कृषी विभागाने दिली.


### अर्थसाहाय मिळालेले तालुकानिहाय शेतकरी

अचलपूर १०,६५३, अमरावती१२,८६४, अंजनगाव सुर्जी १६,२४६, भातकुली १४,४०५, चांदूर रेल्वे १३,०८१, चांदूर बाजार १४,८१६, चिखलदरा ४,९०९, दर्यापूर १९,८७५, धामणगाव रेल्वे १२,३४४, धारणी ६६४४, मोर्शी १५,९६६, नांदगाव खंडेश्वर १९,८७२, तिवसा १३,३६५, व वरूड तालुक्यात ९५१२ शेतकऱ्यांना अर्थसाहाय मिळण्याची प्रक्रिया आता सुरू झालेली आहे.

# पीडित बालक, समस्याग्रस्त व्यक्तीचे निरपेक्षपणे समुपदेशन करून मूल्यांकन करणे आवश्यक - न्यायमूर्ती श्रीमती मंगला कांबळे

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३ अमरावती** संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील आजीवन अध्ययन व विस्तार विभाग व विपला फाऊंडेशन, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने एम. ए. समुपदेशन व मानसोपचार या अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांसाठी 'बालकांचे समुपदेशन व त्याचा सकारात्मक परिणाम' या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यशाळेच्या प्रमुख वक्त्या श्रीमती मंगला कांबळे यांनी बालक व स्त्रिया यांच्यावरील होणाया अन्यायाला कसा प्रतिबंध घालता येईल, याकरीता कोणते कायदे आहेत, त्यांचा प्रभावी वापर कसा करता येईल व संबंधित पोलीस विभाग तसेच न्याय विभाग इतर सामाजिक संस्था यांची कशी मदत घ्यावी याविषयी समुपदेशकांना सखोल मार्गदर्शन केले. अध्यक्षीय भाषणातून डॉ. श्रीकांत पाटील यांनी आजीवन अध्ययन व विस्तार विभागातील विविध अभ्यासक्रम विद्यार्थी व समाजाच्या विकासासाठी कसे उपयुक्त आहे हे सांगितले. कार्यशाळेच्या पहिल्या सत्रात बालकांचे संरक्षण व त्यांचे समुपदेशन या विषयावर डॉ. विकास सावंत (डिपार्टमेंटल कॉर्डिनेटर अमरावती सेव द चिल्ड्रन इंडिया) यांनी बालकांचे मूलभूत अधिकार, त्यांचे संरक्षण विषयक कायदे त्यांचे हक्क काय आहेत? तसेच बालकांचे



समुपदेशन कसे करावे, त्यांचा विश्वास कसा संपादन करावा याविषयी समुपदेशकांनी कोणती जीवन कौशल्य विकसित करावी याचे प्रात्यक्षिक विविध चित्रफिती दाखवून समजावून सांगितले. या सत्राच्या अध्यक्षस्थानी प्रा. सुरेश रहाटे होते. आपल्या संवादातून त्यांनी बालकाचे हक्क व संरक्षणासाठी समुपदेशकाची भूमिका किती महत्त्वाची असते हे विषद केले. कार्यशाळेचा द्वितीय सत्रात डॉ. अनिरुद्ध पाटील (डिपार्टमेंटल कॉर्डिनेटर अमरावती सेव्ह द चिल्ड्रन इंडिया) यांनी संरक्षण विषयक कायदे यावर प्रकाश टाकला व त्याचबरोबर विद्यार्थ्यांमध्ये चर्चा घडवून आणली. बालकांच्या समुपदेशना मध्ये कोणत्या अडथळे व अडचणी येऊ शकतात, त्यांचा विश्वास कसा संपादन करावा त्यांचे समुपदेशन कसे करावे याचे प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले. तृतीय सत्रामध्ये डॉ. प्रतिभा टेटू (बोर्ड ऑफ डायरेक्टर, स्टेज परफॉर्मन्स सिक्युरिटी बोर्ड सेन्सर बोर्ड गव्हर्मेंट ऑफ महाराष्ट्र मुंबई) यांनी आनंदी जीवन कसे जगावे? जीवनात जीवन कौशल्याचे महत्त्व काय? ती विकसित कशी करावी? त्याचे महत्त्व पटवून दिले. अध्यक्षीय भाषणातून डॉ. श्रीकांत पाटील यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र वितरित करण्यात आले. संचालन प्रा. अर्चना ढोरे, तर आभार प्रा. सुरेश रहाटे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीत साठी समन्वयक प्रा. जुबेर खान, डॉ. मंजुषा बारबुद्धे, प्रा. शिवानी अग्रवाल, प्रा.प्रियंका तायडे, प्रा. स्नेहल वानखडे यांनी सहकार्य केले.

# जय जगदंबा वेद विद्यालयाच्या नवीन वास्तूचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते भूमिपूजन

## मुख्यमंत्र्यांनी घेतले जगदंबा मातेचे दर्शन कोनशिलेचे अनावरण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३बुलढाणा**

खामगांव येथील श्री महर्षी वेद व्यास प्रतिष्ठान, आळंदीअंतर्गत जय जगदंबा वेद विद्यालयाच्या नवीन वास्तूचे भूमिपूजन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते गुरुवारी करण्यात आले.



खामगांवमधील घाटपुरी येथील श्री.जय जगदंबा माता संस्थान येथे आयोजित या भूमिपूजन समारंभास केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण तथा आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव, अयोध्येच्या श्रीराम जन्मभूमी तिर्थक्षेत्राचे कोषाध्यक्ष स्वामी गोविंददेव गिरीजी महाराज, आमदार आकाश फुंडकर, आमदार संजय गायकवाड, संस्थानाचे अध्यक्ष पंकज केला, उपाध्यक्ष कृष्णकुमार भट्टड, संस्थानचे पदाधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रथम श्री जगदंबा मातेचे दर्शन घेवून पूजन केले. तसेच जय जगदंबा वेद विद्यालयाच्या नवीन वास्तूचे भूमिपूजन करुन कोनशिलेचे अनावरण केले. यावेळी संस्थांनच्या वतीने मुख्यमंत्र्यांचा स्मृतिचिन्ह देवून सत्कार करण्यात आला. याप्रसंगी मुख्यमंत्र्यांनी वारकरी संप्रदायांशी संवाद साधला.



# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाकडून जेंडर ऑडीटसाठी पुढाकार







जागतिक आणि राष्ट्रीय पातळीवर लैंगिक समानतेसाठी अनेक पाऊले उचलण्यात येत आहेत. विविध संस्थांचे जेंडर ऑडीट करणे, हा त्याचाच एक भाग आहे. विद्यापीठ पातळीवर लैंगिक समानतेच्या दृष्टीने धोरणात्मक कार्य करण्यासाठी जेंडर ऑडीट हे एक महत्त्वाचे पाऊल ठरणार आहे. वुमेन्स स्टडीज सेंटरद्वारा हे जेंडर ऑडीट करण्यात आले असून सद्य:स्थितीत ते विद्यापीठ परिसरापुरतेच मर्यादित आहे. लवकरच विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांची माहिती मागविण्यात येणार असून त्यांचेही जेंडर ऑडीट करण्यात येईल.

**– डॉ. मिलींद बारहाते, कुलगुरू, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती**

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती**

साधारणत: आर्थिक बाबींचे ऑडीट करण्यावर विशेष लक्ष देण्यात येते. त्यातुलनेत इतर बाबींचे ऑडीट करण्यावर फारसे लक्ष देण्यात येत नाही. अलीकडे मात्र संस्थात्मक पातळीवर विविध घटकांचे ऑडीट करण्यावर देखील भर देण्यात येत आहे. यामध्ये कोणत्याही संस्थेचे जेंडर ऑडीट करणे अतिशय महत्त्वाचे असते. सदर बाब लक्षात घेऊन संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या मार्गदर्शनात विद्यापीठातील वुमेन्स स्टडीज सेंटरद्वारे जेंडर ऑडीट तयार करण्यात आले आहे.

या अंतर्गत सध्या पहिल्या पातळीवर शैक्षणिक वर्ष २०२३–२४ मधील विद्यापीठ परिसरातील माहिती संकलित करण्यावर भर देण्यात आला आहे. विद्यापीठातील विविध शैक्षणिक अभ्यासक्रमांना प्रवेशित विद्यार्थ्यांचा प्रवर्गनिहाय प्रवेश, विद्यार्थ्यांचा खेळांमधील आणि सांस्कृतिक कार्यक्रमांतील सहभाग तसेच 'कमवा आणि शिका' या योजनेतील विद्यार्थ्यांचा सहभाग या संदर्भातील माहिती संकलित करण्यात आली. सोबतच विद्यापीठातील एकूण शिक्षक, शिक्षकेत्तर, अंशदायी शिक्षक यांच्या प्रमाणाची माहिती गोळा करण्यात आली. या सर्व माहितीच्या आधारे लिंगभाव दृष्टीकोनातून माहितीचे विश्लेषण करण्यात आले. यामधून स्त्री–पुरुषांच्या प्रमाणाच्या स्थितीचा अभ्यास करण्यात आला. त्यामुळे प्राथमिक पातळीवर असे आढळून आले की, विद्यापीठातील शैक्षणिक अभ्यासक्रमांना प्रवेशित विद्यार्थ्यांमध्ये मुलांपेक्षा मुलींचे प्रमाण अधिक आहे. मात्र अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्षाच्या प्रवेशात एसटी आणि व्हीजेएनटी प्रवर्गात मुलांच्या तुलनेत मुलींचे प्रमाण कमी आहे. अभ्यासक्रमांच्या द्वितीय वर्षाच्या प्रवेशात एसटी आणि एसबीसी प्रवर्गात मुलांच्या तुलनेत मुलींचे प्रमाण कमी आहे. खेळांमध्ये मुलांच्या तुलनेत मुलींचे प्रमाण कमी आहे तर सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये मुलांच्या तुलनेत मुलींचे प्रमाण जास्त आहे. 'कमवा आणि शिका' या योजनेअंतर्गत लाभ घेणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये मुलांच्या तुलनेत मुलींचे प्रमाण अधिक आहे. विद्यापीठातील शिक्षकांमध्ये पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांचे प्रमाण कमी आहे. अंशदायी शिक्षकांमध्ये पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांचे प्रमाण अधिक आहे, तर शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांमध्ये पुरुषांचे प्रमाण अत्याधिक असून स्त्रियांचे प्रमाण अतिशय अत्यल्प आढळून आले आहे.

अहवालात विद्यापीठ परिसरात उपलब्ध असणाऱ्या काही सेवा सुविधांचा तसेच भौतिक पर्यावरणाचा, अँटी रॅगिंग कमिटी आणि अंतर्गत महिला तक्रार निवारण समिती इत्यादींचाही अभ्यास समाविष्ट आहे. या अभ्यासामध्ये आवश्यक भाग वाढविण्यात येणार असून त्याच्या आधारे विद्यापीठाशी संलग्नित असणाऱ्या महाविद्यालयांमधील जेंडर ऑडीटच्या दृष्टीने आवश्यक माहितीचे संकलन पुढील टप्प्यात करण्यात येणार आहे. यासाठी मा. कुलगुरू यांच्या मार्गदर्शनात पुढील प्रक्रिया करण्यात येणार आहे. जेंडर सेन्सिटायझेशन आणि जेंडर इक्वालिटी या दृष्टीकोनातून जेंडर ऑडीट महत्त्वाचे ठरणार आहे. कुलगुरूंनी डॉ. वैशाली गुडधे आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे या उपक्रमाबद्दल कौतुक करून शुभेच्छा दिल्या आहेत.

# वुमेन्स स्टडीज सेंटरद्वारे मुलींसाठी सायबर सुरक्षा जाणीव जागृती कार्यशाळा संपन्न



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती**

आधुनिक युगात संगणक क्रांती झालेली आहे. इंटरनेटच्या माध्यमातून मानवाचे जीवन अधिक सोयीचे झाले आहे. परंतु इंटरनेटचा जेवढा अधिक वापर वाढत गेला, तसतसे सायबर गुन्ह्यांचे प्रमाण वाढायला सुरुवात झाली. सायबर गुन्ह्यांच्या अंतर्गत आर्थिक फसवणूक तर होवूच लागली, तशीच मानवाच्या प्रतिष्ठतेला सुद्धा हाणी पोहचवल्या जावू लागली आहे. त्यादृष्टीने सायबर सुरक्षा लक्षात घेवून व्यवहार अधिक काळजीपूर्वक करावे, असे प्रतिपादन तज्ज्ञ मार्गदर्शक श्री ममेश माथनकर यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील वुमेन्स स्टडीज सेंटरद्वारे संशोधन प्रकल्पाच्या अंतर्गत विद्यापीठातील ज्ञान स्त्रोत केंद्राच्या सेमिनार हॉल येथे 'सायबर सुरक्षा : जाणीवजागृती' याविषयावर आयोजित एकदिवसीय कार्यशाळेत ते बोलत होते. यावेळी विचारमंचावर कार्यक्रमाच्या अध्यक्ष म्हणून वुमेन्स स्टडीज सेंटरच्या संचालक डॉ. वैशाली गुडधे उपस्थित होत्या.

श्री ममेश माथनकर यांनी सायबर गुन्ह्यांची संकल्पना सांगितली. सायबर गुन्ह्यांचे विविध प्रकार असून त्याद्वारे होणारी फसवणूक सांगितली. यामध्ये त्यांनी हॅकिंग, फिशिंग, Identity Theft, सोशल इंजिनीअरिंग, फेक कस्टमर केअर नंबर, फेक_हरीरीं डीपी, हनी ट्रॅप, फेक पोलीस फसवणूक, फेक फिंगरप्रिंट/आधार, सायबर ग्रुमिंग, सायबर बुलिंग, मॉर्फिंग, सायबर डिफेमेशन, सायबर स्टॉकिंग, व्हाईस क्लोनिंग फसवणूक, फेस क्लोनिंग फसवणूक, जड्द फसवणुकीविषयी अशा विविध सायबर गुन्ह्याविषयी सांगून हे गुन्हे कशाप्रकारे घडतात याबद्दल विस्तृत विवेचन केले. सायबर गुन्हा घडल्यावर कोणत्या प्रकारची काळजी घ्यावी तसेच सायबर गुन्ह्या विरुद्ध तक्रार कुठे व कशी करावी याबाबत मार्गदर्शन केले. सायबर सुरक्षेच्या दृष्टीकोनातून थांबा, विचार करा आणि नंतर कृती करा अशा त्रीसुत्रीचा संदेश त्यांनी सर्वांना दिला.

अध्यक्षीय मनोगतात डॉ. वैशाली गुडधे म्हणाल्या, सायबर गुन्हे हे सध्या आपल्या आजूबाजूच्या परिसरात घडताना दिसून येत आहे. यामध्ये महिलांप्रमाणे लहान मुले व पुरुष सुद्धा अधिक प्रमाणात बळी पडतात. त्यामुळे सर्वांनी सायबर गुन्ह्यांच्या बाबत अधिक सतर्कतेने काळजी घ्यावी. कार्यशाळेतील सायबर सुरक्षेबाबत असणारी सर्व माहिती केवळ स्वत: पुरती मर्यादित न ठेवता आपापल्या कुटुंबात, महाविद्यालय आणि समाजातील इतर घटकांपर्यंत पोहचविण्यात येण्याचे आवाहन केले. वुमेन्स स्टडीज सेंटरला WRC-ICSSR मुंबई यांच्याद्वारे २०२४–२५ या शैक्षणिक वर्षासाठी Minor Research Project अंतर्गत प्रायोगिक पद्धतीचा उपयोग करण्याच्या दृष्टीने प्रायोगिक कार्यक्रम घ्यायचे होते. सदर कार्यशाळा त्यानुसारच घेण्यात आली. या कार्यशाळेत उपस्थित सर्व मुलींकडून सायबर सुरक्षा जाणीवजागृतीबाबत एक पूर्व चाचणी, उत्तर चाचणी आणि प्रश्नावली भरून घेण्यात आली. श्री ममेश माथनकर यांनी सायबर सुरक्षा जाणीव जागृतीविषयक मार्गदर्शन केले. सायबर सुरक्षा जाणीवजागृतीबाबत तुलनात्मक अभ्यास करून संशोधन प्रकल्प पूर्ण करण्यात येणार आहे. अमरावती शहराप्रमाणेच अमरावती जिल्ह्यातील तालुकानिहाय कार्यशाळा घेण्यात येणार आहे. यामध्ये चिखलदरा, चांदूर रेल्वे, धामणगाव रेल्वे, मोर्शी, वरुड, चांदूर बाजार, अचलपूर आणि अंजनगाव सुर्जी इ. तालुक्यांच्या समावेश आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक वुमेन्स स्टडीज सेंटरचे प्रकल्प सहायक डॉ. वैभव अर्मळ यांनी, संचालन अनुराग मेश्राम व आभार प्रदर्शन मनीषा वानखडे यांनी केले. कार्यशाळेला विद्यार्थीनींचा उत्स्फूर्त प्रतिसाद होता. मोठ्या संख्येने विद्यार्थिनी व महिला प्राध्यापक उपस्थित होते.

# गोल्डन किडस्च्या मुलीची राज्यस्तरावर चमकदार कामगिरी

## बँकॉक व नेपाळ येथील आंतरराष्ट्रीय टेनिस क्रिकेट स्पर्धेकरिता निवड





**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती**

७ वी ज्यूनिअर राष्ट्रीय टेनिस क्रिकेट स्पर्धा व १७ वी सीनियर राष्ट्रीय टेनिस क्रिकेट स्पर्धा महाराष्ट्र नाशिक येथे २३ सप्टेंबर ते २९ सप्टेंबरदरम्यान झाल्या. यामध्ये विविध राज्यातून संघ सहभागी झालेले होते. मध्यप्रदेश, उत्तर प्रदेश, बिहार, झारखंड, बिहार, विदर्भ, दिव दमन, मुंबई हे संघ स्पर्धेकरिता उपस्थित होते.

मुलींच्या संघांमध्ये महाराष्ट्र विदर्भ, दिव दमन, मुंबई, मध्य प्रदेश या संघांची उपस्थिती होती. यामध्ये सीनियर महाराष्ट्र संघामध्ये, कु. आयुषी बोराळे, कु. पूर्वा इंगोले, कु. हर्षाली पाल, कु. सायली राजुरकर यांचा समावेश होता. ज्युनिअर महाराष्ट्र संघामध्ये कु. ईश्वरी विजय फाले (कर्णधार), कु. गोजिरी लव्हाळे, कु. ईश्वरी देशमुख, कु. विशालाशी साबळे, कु. भार्गवी बाखडे यांचा समावेश होता.

गुणांच्या आधारावर महाराष्ट्र संघाला द्वितीय क्रमांकावर समाधान मानावेलागले. मध्य प्रदेश व मुंबई संघाने संयुक्तिक रित्या विजेतेपद प्राप्त केले. बँकॉक येथे होणाऱ्या आंतर राष्ट्रीय सीनियर महिला टेनिस क्रिकेट स्पर्धेकरिता पूर्वा इंगोले, आयुषी बोराळे, सायली राजूरकर, हर्षाली पाल यांची निवड झालेली आहे. तसेच नेपाळ येथे होणाऱ्या ज्युनिअर टेनिस क्रिकेट मुलींच्या स्पर्धेकरिता, ईश्वरी विजय फाले, विशालक्षी साबळे यांची निवड झालेली आहे.

भारतीय टेनिस क्रिकेट असोसिएशनच्या सचिव सौ. मीनाक्षी गिरी यांनी सर्वांचे अभिनंदन केले आहे. अमरावतीकरांसाठी ही फार अभिमानाची गोष्ट आहे. या सर्वखेळाडू स्थानिक गोल्डन किड्स इंग्लिश हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी यांचा सराव नितीन सराफ (सचिव अमरावती जिल्हा टेनिस क्रिकेट असोसिएशन) यांच्या मार्गदर्शनात होत असतो. या सर्व विद्यार्थी खेळाडूंचे संस्थेच्या सचिव सौ. हर्षदा पांडे, मुख्याध्यापक उमाशंकर सिंगरोल, पर्यवेक्षक पराग देशपांडे, वर्गशिक्षक, संस्थेचे पदाधिकारी, अमरावती जिल्हा टेनिस क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष माजी महापौर विलास इंगोले यांनी खेळाडूंचे कौतुक केले. खेळाडूंनी आपल्या यशाचे श्रेय त्यांचे पालक, प्रशिक्षक नितीन सराफ, सौ. सुमेधा पारखी यांना दिले आहे.

# खाद्यतेलाचे भाव वाढल्याने सर्वसामान्यांचे बजेट कोलमडले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. ३ अमरावती**

केंद्र सरकारने आधारभूतदरात सोयाबीनच्या किमती मोठ्या प्रमाणात वाढविल्याने अचानक खाद्यतेलाच्या किमतीचा भडका उडाला. त्यामुळे सोयाबीनच्या तेलाची किंमत आता १४५ रुपये प्रतिलिटर झाल्याने गृहिणींचे बजेट कोलमडले आहे. या वाढत्या खाद्यतेलाच्या किमती पाहून स्वयंपाकासाठी तेल वापरावे की नाही, असा प्रश्न लाडक्या बहिणी करू लागल्या आहेत. हाताला काम नसल्याने सर्वसामान्य वर्ग अगोदरच अडचणीत सापडलेला आहे. पामतेलावरील वाढलेले आयात भाव आणि शेंगदाण्याची होत असलेली निर्यात यामुळे खाद्यतेलाच्या दरात मोठी भाववाढ झाली आहे. सर्वसाधारण कुटुंबांमध्ये सर्वाधिक सोयाबीन तेलाचा वापर केलाजात असल्याने वाढत्या महागाईने लाडक्या बहिणींच्या कुटुंबातील सदस्यांचे बजेट कोलमडले आहे. सध्या तेलबियांचे नवीन पीक बाजारात येण्यासाठी एक महिन्याचा कालावधी असताना पुढील महिन्यापर्यंत भाववाढ कायम राहण्याची शक्यता व्यक्त केली जात होती.

# पंचायत समिती कर्मचारी, अधिकाऱ्यांतर्फे निरोप : कार्य कर्तृत्वाचा सन्मान व सत्कार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३ धामणगाव रेल्वे**

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर माया वानखडे यांची अकोला जिल्ह्यातील अकोट पंचायत समितीच्या बदलीने पदस्थापना प्रशासना कडून करण्यात आली आहे.दरम्यान पंचायत समिती कर्मचारी, अधिकाऱ्यांतर्फे त्यांना निरोप देण्यात आलं.यावेळी त्यांच्या कार्य कर्तृत्वाचा सन्मान करून सत्कार करण्यात आला.

भारतीय निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार, महाराष्ट्र विकास सेवेतील गटविकास अधिकारी संवर्गाच्या बदल्या करण्यात आल्या आहेत.यात माया वानखडे यांची अकोला जिल्ह्यातील अकोट पंचायत समितीच्या बदलीने पदस्थापना करण्यात आली आहे.दरम्यान त्यांचा निरोप सोहळा येथील पंचायत समितीच्या सभागृहात मंगळवारला (ता.१) पार पडला.यात त्यांच्या कार्य कर्तृत्वाचा सन्मान करून सत्कार करण्यात आला.



यावेळी सहाय्यक प्रशासन अधिकारी प्रशांत जोशी, कनिष्ठ प्रशासन अधिकारी संजय गुल्हाने,गजानन सांगळे,सहाय्यक लेखाधिकारी अमोल गोफणे, कृषी अधिकारी श्री सावळे, कृषी विस्तार अधिकारी श्री खंडेझोड कनिष्ठ लेखाधिकारी श्री कापकर, कनिष्ठ अभियंता प्रवीण आखरे,अभिजीत कल्ले विस्तार अधिकारी पंचायत मीना मसतकर,विस्तार अधिकारी सांख्यिकी श्री मिसाळ, स्थापत्य अभियांत्रिक सहायक शशांक जारी,अजिंक खेर्डे श्री बनपट्टे,वरिष्ठ सहाय्यक प्रकाश महात्मे,गजेंद्र काळे, श्री काश्टे, संजय चव्हाण, सचिन गायकी कनिष्ठ सहाय्यक श्री चव्हाण,अमोल कावरे,पंकज यादव,मंगेश राऊत,लखन चव्हाण, प्रशांत मनवर,श्री वानखेडे, मोबीन खान,सोनाली कडू,श्रीमती सुलताने, मीनल पाटील,श्रीमती राठोड,श्रीमती हुमणे, ग्रामसेवक संघटनेचे अध्यक्ष सुनील केणे,ग्राम विकास अधिकारी राजू अहिरवार,सचिन तसर, स्वच्छ भारत मिशन जलजीवन मिशन मधील प्रेमकुमार अंबुलकर, विशाल सुटे,राष्ट्रीय ग्राम स्वराज्य अभियान परिचर संघटना रवींद्र देशमुख, बंडू वैरागडे,राजू पांडे,हेमलता परमार,राजू पवार,राजू राजू शिरसोदे,ऋषिकेश ढोले, सरपंच संघटना,रोजगार सेवक, केंद्र चालक संघटना व इतर सर्व संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते. संचालन विशाल सुटे यांनी केले.

# राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांचे आगमन व स्वागत



**विदर्भ प्रजासत्ताक दि.३अमरावती**

राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांचे आज दुपारी चार वाजता बेलोरा येथील विमानतळावर शासकीय हेलीकॉप्टरने आगमन झाले. प्रशासनाच्या वतीने त्यांचे स्वागत करण्यात आले.यावेळी विभागीय आयुक्त डॉ. निधी पाण्डेय, जिल्हाधिकारी सौरभ कटियार, कुलगुरू डॉ. मिलिंद बाराहाते, मुख्य कार्यकारी संजिता मोहपात्रा, पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी, जिल्हा पोलीस अधीक्षक विशाल आनंद, महापालिका आयुक्त सचिन कलंत्रे आदी उपस्थित होते.

# अंबादेवी व एकविरा देवी मंदिरात आजपासून शारदीय नवरात्रोत्सवाला सुरुवात



## पहिल्याच दिवशी भाविकांची गर्दी






**विदर्भ प्रजासत्ताक दि.३अमरावती**

विदर्भाची कुलस्वामिनी असलेल्या अमरावतीच्या अंबादेवी मंदिरात आजपासून शारदीय नवरात्री उत्सवाला सुरुवात झाली आहे, या अंबा देवीला विदर्भाचे कुलदैवत म्हणून संबोधल्या जाते. विदर्भातील प्राचीन शहर असलेल्या अमरावती शहराची पौराणिक दृष्ट्या ओळख आहे.

कौंडण्यपूर येथील विदर्भ राज्य करणाऱ्या भीष्मक राजाने आपली सुकन्या रुक्मिणीचा विवाह शिशुपालाशी ठरवला होता, तो तिला अमान्य होता, तिने श्रीकृष्णाला आपली इच्छा कळवताच श्रीकृष्णाने कौंडण्यपूर येथे येऊन माता रुक्मिणीचे हरण केले व याच अमरावतीच्या अंबादेवी मंदिरात आणून अंबादेवी मंदिरात भगवान श्रीकृष्णाने रुक्मिणीशी विवाह केल्याची आख्यायिका आहे. श्रीकृष्ण काळापासून हे मंदिर अस्तित्वात असून आजही अमरावती शहरातील तिचं स्थान जागृत समजले जाते.आज गुरुवार दि. ३ ऑक्टोबर ला पहाटे ५:०० वाजता संस्थानचे सचिव रविंद्र कर्वे व सौ. कर्वे यांचे हस्ते श्री अभिषेक करण्यात आला व नंतर घटस्थापना झाली. सकाळी ८:३० वाजता संस्थानचे सचिव श्री दिपक श्रीमाळी व सौ. श्रीमा ध्वजारोहण करण्यात आले. रोज सकाळी ५:०० वाजता देवीला अभिषेक करण्यात येईल.यंदा नवमीच्या होमाला शुक्रवारी दि. ११/१०/२०२४ रोजी दुपारी १२:३० पासून सुरुवात होईल. सायंक सुमारास पूर्णाहुती संपन्न होईल. यंदा होमाचे यजमान श्री दिपक श्रीमाळी व सौ. श्रीमाळी तसेच श्री रविंद्र कर्वे असतील.

दरवर्षी प्रमाणे यंदाही विजयादशमी निमीत्त श्री अंबादेवी व श्री एकवीरा देवीची संयुक्त पालखी दुपारी सीमोल्लंघनासाठी प्रस्थान करेल. ब्रिजलाल बियाणी कॉलेज मधील परंपरागत स्थानी महाआरती होवून पालखी परत येईल

# आधार कार्ड बघूनच गरब्यात प्रवेश द्या, विश्व हिंदू परिषदेचे आवाहन



**विदर्भ प्रजासत्ताक दि.३ अमरावती**

लव्ह जिहाद सारखे प्रकार रोखण्यासाठी गरबामध्ये प्रवेश देताना आधार कार्ड तपासा, आणि प्रत्येकाच्या डोक्यावर टीळा लावा अशी मागणी विश्व हिंदू परिषदेच्यावतीने करण्यात आली आहे.

गरबा हा श्रद्धेचा आणि भक्तीचा विषय आहे. फक्त नृत्य आणि इव्हेंट नाही. त्यामुळे गरबा आयोजनाच्या स्थळी देवीबद्दल श्रद्धा नसलेल्या, भक्ती नसलेल्यांनी प्रवेश दिला जाऊ नये. गरबा उत्सवात श्रद्धा नसताना, देवीबद्दल भक्ती नसताना ही अनेक इतर धर्मीय तिथे प्रवेश घेतात आणि हिंदू महिला आणि तरुणींची छेड काढतात.

पुढे लव्ह जिहाद सारख्या समस्या निर्माण होतात. त्यामुळे गरबा आयोजन करणाऱ्या मंडळांनी आधीच काळजी घ्यावी असे आवाहन विश्व हिंदू परिषदेचे महाराष्ट्र आणि गोवा प्रांत मंत्री गोविंद शेंडे यांनी केली आहे.

विहिंपने गरबा उत्सव आयोजन करणाऱ्यांना मंडळांना संपर्क साधून तशी व्यवस्था करण्यास सांगितले आहे. गरबा उत्सवात येणाऱ्यांचे आधार कार्ड तपासणे आणि दरावरील व्यवस्थेसाठी आयोजन मंडळांकडे कार्यकर्ते नसल्यास विहिंप आपले कार्यकर्ते मदतीसाठी उपलब्ध करून देणार आहे. गेल्या काही वर्षांपासून गरबा सणात फक्त हिंदू धर्मीयांनाच प्रवेश देण्यात यावा अशी मागणी विहिंप आणि बजरंग दलाकडून केली जात आहे.

# नागपूर मेडिकलमध्ये ७७ हजार बनावट गोळ्यांचे वाटप

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३नागपूर :**

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (मेडिकल) मध्ये 'रिक्लेव्ह ६२५' ही अँटिबायोटिक औषधी बनावट असल्याचे अन्न व औषध प्रशासनाच्या (एफडीए) च्या तपासणीत उघड झाल्याने एकच खळबळ माजली आहे.

महत्त्वाचे म्हणजे जवळपास ७७ हजार या बनावट औषधांचे रुग्णांचे वाटपही करण्यात आल्याचे उघडकीस आले आहे. रुग्णांच्या जिवाशी खेळ सुरू असल्याने सर्वच स्तरातून संताप व्यक्त करण्यात येत आहे.अँटिबाटिक असलेल्या 'रेसीफ-५००' नावाच्या औषधात 'सिप्रोफ्लोक्सासिन' नावाचा घटक असल्याचे तपासणीत आढळून आले आहे. नागपूरच्या 'एफडीए'ने नुकतेच जिल्हा शल्य चिकित्सक अंतर्गत येणाऱ्या आरोग्य विभागाच्या औषध भंडारातील हा बनावट औषधींचा पर्दाफाश केला.

गुजरात येथील 'रिफायंड फार्मा' नावाच्या कंपनीने हे औषध असले तरी ही कंपनी अस्तित्वातच नसल्याचे चौकशीतून समोर आले आहे. या प्रकरणात कळमेश्वर पोलिसांनी सहा जणांना अटक केली आहे. पाच जण तुरुंगात आहे. हे प्रकरण ताजे असताना आता मेडिकलच्या औषध भंडारातून 'रिक्लेव्ह ६२५' या अँटिबायोटिक औषधीही बनावट असल्याचे 'एफडीए'च्या तपासणीतून पुढे आल्याने एकच खळबळ माजली आहे.यामुळे या पुरवठादारांच्या कार्यपद्धतीवर प्रश्न चिन्ह निर्माण झालेले आहे. सोबतच बंद असलेल्या कंपनीची औषधी मेडिकलमध्ये कशी आली, त्याची तपासणी संबंधितांनी केली नव्हती असा प्रश्न उपस्थित केल्या जात आहे.


# सरकारी तिजोरीत खडखडाट! आता स्टॅम्प ड्युटीसाठी मोजावे लागणार ५०० रुपये : राज्य सरकारचा निर्णय

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३अमरावती**

महाराष्ट्र सरकारच्या मंत्रिमंडळाने ३० सप्टेंबर रोजी निवडक मालमत्ता व्यवहारांसाठी मुद्रांक शुल्क दरांमध्ये सुधारणा जाहीर केली. कामाचे कंत्राट, भूखंडांचे एकत्रीकरण, पुनर्रचना, विभागणी आणि विलीनीकरणासाठी आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या नोंदणीसाठी मुद्रांक शुल्कात सुधारणा करण्याचा निर्णय महाराष्ट्र सरकारने घेतला आहे.

राज्य मंत्रिमंडळाने असेही म्हटले आहे की, कोणत्याही दस्तऐवजाची नोंदणी १०० मध्ये केली जाणार नाही. अगोदर कागदपत्रांच्या नोंदणीसाठी आकारली जाणारी किमान रक्कम १०० रुपये होती.आता मुद्रांक शुल्क १०० वरून ५०० रुपये करण्याचा प्रस्ताव आहे. झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पांशी संबंधित कागदपत्रांच्या नोंदणीच्या बाबतीत हे लागू होईल. याचा अर्थ असा आहे की झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण योजनेवर १०० चे मुद्रांक शुल्क आता ५०० आकारले जाईल.

कंपनीच्या आर्टिकल्स ऑफ असोसिएशनसाठी आकारले जाणारे मुद्रांक शुल्क सध्याच्या ५० लाखांऐवजी जास्तीत जास्त १ कोटींसाठी पूर्वीच्या ०.२% वरून ०.३% वाढवण्याचा प्रस्ताव आहे, असेही त्यात म्हटले आहे.गृहखरेदीदारांनी खरेदी केलेल्या मालमत्तेसाठी आकारण्यात येणाऱ्या मुद्रांक शुल्कात कोणताही बदल होणार




नाही. सध्या मुंबईतील घर खरेदी करणाऱ्यांना एकूण मालमत्तेच्या किमतीच्या सहा टक्के मुद्रांक शुल्क भरावे लागते आणि महिला गृहखरेदी करणाऱ्यांसाठी ते पाच टक्के आहे, असे तज्ज्ञांनी सांगितले.

मुद्रांक शुल्काचा स्लॅब शहरानुसार वेगळा असतो. मालमत्ता खरेदीसाठी नोंदणी शुल्क ३० लाखांपर्यंतच्या मालमत्तेसाठी एक टक्के किंवा ३० लाखांपेक्षा जास्त मालमत्तेसाठी ३०,००० आहे.

सरकारने महसुली वाढीसाठी मुद्रांक शुल्क वाढीचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला, असे सरकारने सांगितले आहे. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. दस्तप्रकारांमध्ये सोपेपणा व नेमकेपणा आणून व्यवसाय सुलभता आणणे, दर रचनेत सुटसुटीतपणा आणणे यासाठी सुधारणा करण्यात आली आहे. यामुळे वर्षाकाठी शंभर ते दिडशे कोटी मसूल वाढ होईल असा अंदाज आहे.

# बाजारात झेंडू दरवळला, मागणी वाढली नवरात्रोत्सवामुळे भाव झाले दुप्पट





**विदर्भ प्रजासत्ताक दि.३ अमरावती**

नवरात्रोत्सवासाठी फुलांनामोठी मागणी असते. त्यामुळे फुलांच्या दरात दुप्पट वाढ झाली आहे. गेल्या आठवड्यात ४० ते ५० रुपये किलो दराने मिळणारी झेंडूची फुले आता ऐंशी ते शंभर रुपयांपर्यंत पोहोचली आहेत. अन्य फुलांचे भावही वधारले आहेत.

नवरात्रोत्सवासाठी फुलांना चांगलीमागणी असते. निशिगंध, झेंडू, गलांडा, लीली, गुलाब या पारंपरिक फुलांसह जरबेरा, कॉर्नेशिया आदी हरितगृहातील विदेशी फुलांनाही मोठी मागणी असते. त्यामुळे या काळामध्ये बाजारात दर दुपटीने वाढले आहेत. मोठ्या आकारांची मूर्ती असलेल्या सार्वजनिक नवरात्रोत्सव मंडळांसह, घरगुती पूजेसाठी विविध प्रकारच्या फुलांना व फुलांच्या हारांना मोठी मागणी आहे.

**... म्हणून दरवाढ**

यावर्षी मोठ्या प्रमाणात पाऊस पडला. त्यामुळे फुले अधिक प्रमाणात खराब होऊन फुलांचे उत्पादन घटले आहे. उत्पादन कमी असल्याने दर वाढले आहेत. दरम्यान, चंद्रपूर जिल्ह्यात फुलांची शेळी केली जात नाही. यासाठी वातावरण पोषक नाही. मात्र, काही ठिकाणी झेंडूची लागवड केली जाते. मात्र, सध्या तरी झेंडूच्या फुलांचे उत्पादन सुरू झाले नाही.

**शेवंतीने भाव खाल्ला**

फुले महागल्याने हारांच्या दरातही वाढ झाली आहे. किमान १५० रुपयांपासून २५० रुपयांपर्यंत फुलांच्या हाराची किमत आहे. सार्वजनिक मंडळांच्या मोठ्या दुर्गा मातेच्या मूर्तीसाठीच्या हारांचे दर किमान २०० रुपयांपासून एक ते दीड हजारांपर्यंत आहेत. ४० रुपये किलो मिळणारा झेंडू ८० ते ९० रुपये किलो आहे. मूर्ती पूजनासाठी लाल व पांढऱ्या फुलांना मागणी असल्याने फुलांचे दर सध्या वाढले आहेत.

# अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेवर धोरणात्मक निर्णय घेण्याची उच्च न्यायालयाची बंदी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३अमरावती**




विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, अमरावती यांनी दि.१३/१०/२०२३ रोजीच्या आदेशानव्ये बँकेच्या उपविधीमध्ये दुरुस्ती प्रस्तावित केली होती. सदर आदेशाविरुद्ध बँकेचे संचालक मंडळातील सदस्य हरिभाऊ मोहोड व इतर १२ सदस्यांनी सहकार मंत्री मुंबई येथे अपील दाखल करून दिनांक १३/१०/२०२३ रोजचा आदेश आव्हानित केला होता व विद्यमान सहकार मंत्री महोदय यांनी दिनांक ०३/०९/२०२४ रोजीच्या आदेशानव्ये उपविधी दुरुस्ती बाबतचा आदेश रद्द करून प्रकरण पुनच्छ विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था यांच्या कार्यालयाने उपविधी दुरुस्तीबाबत फेर चौकशी करावी असे आदेश आलेत.

विद्यमान सहकार मंत्री यांच्या आदेशाविरुद्ध बँकेतर्फे उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर येथे याचिका दाखल करण्यात आली व सदर याचिकेमध्ये दिनांक ०१/१०/२०२४ रोजी आदेश पारित होऊन विद्यमान सहकार मंत्री यांनी पारित केलेला आदेश कायम करण्यात आला व संबंधित संचालक मंडळातील सदस्यांना व बँकेला उपविधी बाबत फेर निर्णय घेण्याच्या प्रकरणात दिनांक ०९/१०/२०२४ रोजी विद्यमान विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था यांच्या न्यायालयात उपस्थित राहण्याचे आदेशित करण्यात आले व विद्यमान सहनिबंधक सहकारी संस्था अमरावती यांनी दोन महिन्यात निकाल द्यावी असे आदेशित केले. विद्यमान उच्च न्यायालयात सुनावणी दरम्यान बँकेतील नोकर भरती, उपविधीची पुनश्छ दुरुस्ती, बँकेच्या आर्थिक निर्णयासंबंधी तसेच सभासद भरती व सभासद काढणे याबाबत वाद उपस्थित झाला व तद्नंतर विद्यमान उच्च न्यायालय खंडपीठ, नागपूर यांनी त्यांच्या दिनांक ०१/१०/२०२४ रोजीच्या आदेशानव्ये बँकेचे दैनंदिन कामकाज जुन्या उपविधीप्रमाणे करण्याची बँकेस मुभा दिली परंतु बँकेवर धोरणात्मक निर्णय घेण्यासंबंधी बंदी घातली.सदर न्यायालयीन प्रकरण ५६२४/२४ यामध्ये हरिभाऊ मोहोड + १२ यांच्या बाजूने ज्येष्ठ वकील ड.हरीश डांगरे, ड.निलेश अ.गावंडे यांनी युक्तिवाद केला.

# पान मसाला खाऊन रस्त्यावर थुंकणाऱ्यांचे फोटो वर्तमानपत्रात छापणार? गडकरींनी केली सूचना

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३नागपूर**

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी बुधवारी पान मसाला खाऊन रस्त्यावर थुंकणाऱ्या लोकांची छायाचित्रे क्लिक करून वर्तमानपत्रात प्रसिद्ध करावीत, अशी सूचना केली.नागपुरात आयोजित स्वच्छ भारत अभियान कार्यक्रमाला संबोधित करताना ते म्हणाले की, पूर्वी मी माझ्या गाडीतून चॉकलेटचे रॅपर फेकत असे. आज मी जेव्हा चॉकलेट खातो तेव्हा त्याचे रॅपर घरी घेऊन डस्टबीन मध्ये टाकतो.केंद्रीय मंत्री पुढे म्हणाले की, लोक खूप हुशार आहेत. चॉकलेट खाल्ल्यानंतर ते लगेच त्याचे रॅपर फेकून देतात. मात्र, परदेशात गेल्यावर चॉकलेट खाल्ल्यानंतर ते चॉकलेटचे कव्हर खिशात ठेवतात, परदेशात त्याची वागणूक चांगली आहे.



**पान मसाला खाऊन धुंकणाऱ्यांचे फोटो काढावेत!**

सार्वजनिक ठिकाणी स्वच्छतेचा मुद्दा उपस्थित करत गडकरी म्हणाले की, लोक पान मसाला खातात आणि रस्त्यावर थुंकतात, याचे फोटो काढून ते वृत्तपत्रात प्रसिद्ध केले पाहिजेत. महात्मा गांधींनी असे प्रयोग केले होते, असा दावा त्यांनी केला.